| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक ७४ वा | सोमवार दिनांक २५ मे, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## सर्व पक्षांनी बीएलए नेमून प्रशासनाला सहकार्य करावे - मुख्य निवडणूक आयुक्त एस. चोक्कलिंगम

## कर्तव्यात कसूर करणाऱ्या बीएलओंवर कारवाई करणार- जिल्हाधिकारी श्री.पुजार

धाराशिवे (जिमाका) मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनर्नरीक्षण (Special Intensive Revision - SIR) कार्यक्रमांतर्गत राज्यासह धाराशिव जिल्ह्यात कामाला वेग आला असून, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्या माध्यमातून मतदारांचे मॅपिंग सुरू आहे.मात्र, २००२ मधील मतदार यादी आणि सध्याच्या यादीतील नावे जुळविताना विविध अडचणी निर्माण होत असल्याने कोणत्याही पात्र मतदाराचे नाव वगळले जाऊ नये, यासाठी सर्व राजकीय पक्षांनी आपल्या मतदान केंद्रस्तरीय एजंटांची (बीएलए) नियुक्ती करून प्रशासनाला सहकार्य करावे,असे आवाहन राज्याचे मुख्य निवडणूक आयुक्त एस. चोक्कलिंगम यांनी केले.

आज जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आयोजित मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनर्नरीक्षण आढावा बैठकीत ते बोलत होते.यावेळी जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार,पोलीस अधीक्षक रितू खोखर,निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी शिरीष यादव,उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक अनुप शेंगुलवार, तुळजापूर उपविभागीय पोलिस अधिकारी निलेश देशमुख यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसीलदार तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

श्री.चोक्कलिंगम म्हणाले की,शासनाच्या धोरणानुसार प्रत्येक राजकीय पक्षाने आपल्या जिल्हाध्यक्षांमार्फत अधिकृत बीएलए यादी जिल्हा प्रशासनाकडे सादर करणे अपेक्षित आहे.धाराशिव जिल्ह्यात भारतीय जनता पक्षाने १५२३ बीएलए नियुक्त केले आहेत.मात्र,भारतीय राष्ट्रीय काँग्रेस,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी,राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष,शिवसेना, शिवसेना (उबाठा),वंचित बहुजन आघाडी, बहुजन समाज पार्टी आणि इतर पक्षांकडून अद्याप बीएलएची नियुक्ती करण्यात आलेली नाही.त्यामुळे स्थानिक स्तरावर मतदार मॅपिंग प्रक्रियेत अडथळे निर्माण होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मतदार यादी पुनर्नरीक्षण प्रक्रियेदरम्यान बीएलओंनी प्रत्येक घरी भेट देऊन संबंधित सदस्यांची माहिती,आवश्यक पुरावे घेऊन त्यांची नावे मतदार यादीत समाविष्ट करण्यास प्राधान्य द्यावे,असे निर्देश श्री.चोकलिंगम यांनी दिले.तसेच नाव,वय किंवा अन्य तपशील बदलायचा असल्यास जन्म दाखला,फोटो,स्वाक्षरी यांसारखे आवश्यक पुरावे संकलित करून ते ऑनलाइन अपलोड करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

धाराशिव शहरातील सुमारे एक लाख नागरिकांना नोटिसा पाठविण्यासाठी नगर परिषदेचे मुख्याधिकारी आणि तहसीलदार यांनी संयुक्तपणे कार्यवाही करावी,असे निर्देश देताना श्री.चोकलिंगम यांनी ग्रामीण भागात जनजागृतीसाठी विशेष मेळावे आयोजित करण्यासही सांगितले.मतदार यादीसंदर्भातील सर्व माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रशासनाने व्यापक प्रयत्न करावेत, असेही त्यांनी नमूद केले. एखाद्या नागरिकाचे नाव मतदार यादीतून वगळल्यास त्यामागील कारण स्पष्ट करावे लागणार असून, संबंधित नोटीस व दूरध्वनी संपर्काची नोंद व्यवस्थित ठेवावी लागणार असल्याचे चोक्कलिंगम यांनी स्पष्ट केले.

मॅपिंगचे काम टाळणाऱ्या किंवा हलगर्जीपणा करणाऱ्या बीएलओंना नोटिसा देण्याचे निर्देशही त्यांनी प्रशासनाला दिले.मतदार मॅपिंगची सद्यस्थिती नागरिकांना समजण्यासाठी हेल्प डेस्क सुरू करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.पुरावे नसलेल्या गरीब नागरिकांची नावे यादीतून वगळली जाऊ नयेत,याची विशेष दक्षता घेण्याचे आवाहन त्यांनी केले.कोणाच्याही मनात आपले नाव मतदार यादीतून वगळले जाईल,अशी भीती निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाने मदत करावी,असे श्री.चोकलिंगम म्हणाले.

बीएलओंनी प्रत्येक घराचा क्रमांक आणि मोबाईल क्रमांक अचूक नोंदवावा. त्यामुळे कुटुंब मॅपिंग अधिक प्रभावीपणे करता येईल,असे सांगत मॅपिंग न झालेल्या




मतदारांकडून अर्ज क्रमांक ६ भरून घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.मात्र, त्यासोबत आवश्यक सर्व पुरावे जोडणे बंधनकारक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीत जिल्हाधिकारी श्री.पुजार यांनी उस्मानाबाद-लातूर-बीड विधान परिषद निवडणुक संदर्भातील मतदार संख्या, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी, नोडल अधिकारी,निवडणूक समित्या आदींची माहिती सादर केली.तसेच एसआयआर मॅपिंगसाठी बीएलओंच्या नियुक्त्या, त्यांचे प्रशिक्षण, राजकीय पक्षांसोबत झालेल्या बैठका,बीएलए नियुक्ती, झालेले मॅपिंग आणि आतापर्यंतची कार्यवाही याचा तपशील त्यांनी मांडला.

सन २००२ मध्ये जिल्ह्यात पाच विधानसभा मतदारसंघ होते,मात्र सध्या चार विधानसभा मतदारसंघ अस्तित्वात असल्याचे श्री पुजार यांनी निदर्शनास आणून दिले.जिल्ह्यातील एकूण मतदारसंख्या आणि मॅपिंग पूर्ण झालेल्या मतदारांची आकडेवारीही त्यांनी सादर केली.

जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी सादर केलेल्या कामकाजावर मुख्य निवडणूक आयुक्त एस.चोक्कलिंगम यांनी समाधान व्यक्त केले.दरम्यान,मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनर्नरीक्षणाच्या कामात कसूर करणाऱ्या किंवा दुर्लक्ष करणाऱ्या बीएलओंवर कडक कारवाई करण्यात येईल,असा इशारा जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी यावेळी दिला.

## क्राईम न्युज

### ढोकीतून मोटारसायकलची चोरी

ढोकी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी राहुल विजय पाटील, वय ३७ वर्षे, रा. तेरणा कारखाना वसाहत ढोकी ता. जि. धाराशिव यांची अंदाजे २५,००० किंमतीची मोटरसायकल ही फिर्यादीचे घरासमोरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-राहुल पाटील यांनी दि.२२.०५.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन ढोकी पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### कॉपर कॉईल व ऑईलची चोरी : गुन्हा दाखल

वाशी (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत दि.१६.०४.२०२६ रोजी वाशी उपकेंद्रामध्ये १८०० कि. कॉपर कॉईल व ट्रॅन्सफॉर्मर ऑईल ३४०० लिटर असे एकुण १७,९०,००० किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- फिर्यादी नामे-पराग दादाराव तुरखडे, वय ४१ वर्षे, उपकार्यकारी अभियंता रा. ब्राम्हणसभा कॉलनी परतवाडा ता. अचलपुर जि. अमरावती ह.मु. वाशी ता. वाशी जि. धाराशिव यांनी दि.२२.०५.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### मारहाण करुन जिवे ठार मारले

नळदुर्ग पोलीस ठाणे अंतर्गत विष्णु, गौतमे, योगेश, मनोज , सर्व रा. कार्ला ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.२१.०५.२०२६ रोजी सु. कार्ला येथे मयत नामे-ब्रम्हदेव बब्रुवान मोटे, वय ५५ वर्षे, रा. कार्ला ता. तुळजापूर जि. धाराशिव यांना नमुदांनी सामाईक बोरमधील मोटर आम्हाला न विचारता का काढील असे विचारण्यास गेल्याचे कारणावरुन शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी,लोखंडी पाईप, काठी कोयत्याने मारहाण करुन जिवे ठार मारले. व फिर्यादी नामे- महेश ब्रम्हदेव मोटे, वय २५ वर्षे, रा. कार्ला ता. तुळजापूर जि. धाराशिव हे भांडण सोडवण्यास आले असतान नमुदांनी त्यानांही जिवे ठार मारण्याचे उद्देशाने कोयत्याने मारहाण करुन गंभीर जखमी केले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-महेश मोटे यांनी दि.२२.०५.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे नळदुर्ग येथे गुन्हा नोंदवला आहे.

## अधिक मासानिमित्त महादेव मंदिरात भजनसेवा:नियमित हरिपाठाचा गजर



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- अधिक मास (पुरुषोत्तम मास) निमित्त धाराशिव शहरातील सांजा रोडवरील भवानी चौकातील श्री महादेव मंदिरात दि. १७ मे ते १५ जून कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांसह महिला भजनी मंडळाच्या भजनसेवेचे आयोजन केले आहे.

दररोज दुपारी १ ते ५ वाजतापर्यंत नियमित भजन सेवेसह नियमित हरिपाठ व आरती केली जाते. सकाळी ६:०० वाजता काकड आरती, सकाळी ७ वाजता नियमित आरती, पूजापाठ तर दुपारी एक ते पाच वाजतापर्यंत नियमित भजनातून श्री महादेव विठ्ठल रुक्मिणी मातेच्या नावाचा जयघोष करण्यात येत आहे. विविध प्रकारचे अभंग गायनातून महिला, पुरुष भक्त भगवंताचे नामस्मरण करत आहेत.

या पवित्र महिन्यात भगवान शिव आणि विष्णू यांच्या उपासनेला विशेष महत्त्व असते. धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केल्याने मंदिरात गजबज वाढली आहे. महादेव मंदिरात दि. १७ ते २४ मेपर्यंत संत आबाजी महाराज महिला भजनी मंडळ, सांजा व श्री गणेश महिला भजनी मंडळ सांजातर्फे भजनसेवा करण्यात येणार आहे. तर दि. १८ मे २५ मे व १ व ८ जून रोजी महादेव मंदिर पुरुष भजनी मंडळ, धाराशिवची जनसेवा सेवा असेल.

दि. २ जून व ९ जून रोजी श्री विठ्ठल रुक्मिणी महिला भजनी मंडळ एसटी कॉलनी धाराशिव तर दि. २७ मे व ३ व १० जून रोजी माऊली महिला भजनी मंडळ कोर्ट कॉलनी धाराशिव व हिरकणी महिला भजनी मंडळ धाराशिवची भजन सेवा होईल. तर ४ जून व ११ जून रोजी श्री ज्ञानेश्वर महिला भजनी मंडळ महादेव मंदिर भवानी चौक धाराशिवची भजनसेवा तर २९ मे व ५ जून रोजी श्री लक्ष्मीनारायण महिला भजनी मंडळ सहयोग कॉलनी, धाराशिवतर्फे भजनसेवा आहे. तर ३० मे व १३ जून रोजी श्री गुरुदेव दत्त महिला भजनी मंडळ आशीर्वाद कॉलनी धाराशिव व श्री अष्टविनायक महिला भजनी मंडळ धाराशिवची भजनसेवा होईल.

.... यासाठी करावे धार्मिक विधी अन् दानधर्म अधिक मासात केलेला कोणताही विधी किंवा देवाची पूजाअर्चा अन मानस्मरण हे सर्वसामान्य दिवसांपेक्षा अनेक पटीने जास्त फळ देणारे असते. या मासात मंदिरासह घरोघरी केलेले पूजा-पाठ, धार्मिक कृत्ये आणि गरजू व्यक्तींना केलेले दानधर्मामुळे कुटुंबातील कायमस्वरूपी दारिद्र्य आणि मानसिक क्लेश नष्ट होतात. असे असले तरी अधिक मासात विवाह, गृहप्रवेश, मुंडन आणि उपनयन संस्कार यांसारखे शुभ कार्य करत नाहीत.

## सिलींग जमिनींना पूर्ण मालकी हक्काचा मार्ग मोकळा; पात्र भूधारकांना अर्जाचे आवाहन

धाराशिव (जिमाका) जिल्ह्यातील सिलींग जमीन धारकांसाठी राज्य शासनाने महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक निर्णय घेतला असून,सिलींग जमिनींचा धारणाधिकार भोगवटादार वर्ग-२ मधून थेट भोगवटादार वर्ग-१ अर्थात पूर्ण मालकी हक्कामध्ये रुपांतरित करण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे.या संदर्भातील महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) (भोगवटादार वर्ग-२ चे भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करणे) नियम २०२६ हे नियम राज्य शासनाच्या राजपत्रात दि.४ मे २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आले आहेत.

जिल्ह्यातील सर्व पात्र सिलींग भूधारकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेण्यासाठी संबंधित तहसीलदार कार्यालयात आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावेत,असे आवाहन अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील यांनी केले आहे.

नवीन नियमांनुसार,ज्या सिलींग जमिनींचे वाटप होऊन किमान दहा वर्षांचा कालावधी पूर्ण झाला आहे आणि जमीन वाटप करताना घालण्यात आलेल्या अटी-शर्तींचे कोणतेही उल्लंघन झालेले नाही,अशा जमिनींचा धारणाधिकार भोगवटादार वर्ग-१ मध्ये रुपांतरीत करण्यात येणार आहे.मात्र,पूर्वी जमीन वाटप आदेशातील अटी-शर्तींचा भंग झाला असल्यास संबंधितांनी प्रथम सक्षम प्राधिकाऱ्याकडून लेखी आदेशाद्वारे तो शर्तभंग नियमाधीन करून घेणे आवश्यक राहणार आहे.

शर्तभंग नियमानुकूल झाल्यानंतरच वर्ग-१ रुपांतरणाचा स्वतंत्र प्रस्ताव विचारात घेतला जाणार आहे.या रुपांतरणासाठी शासनास देय असलेले अधिमूल्य हे संबंधित क्षेत्राच्या वापराच्या स्वरूपावर तसेच वार्षिक दर विवरणपत्रानुसार निश्चित करण्यात आलेल्या जमिनीच्या मूल्यावर आधारित राहणार आहे.यापूर्वी सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीने जमिनीचे हस्तांतरण अथवा वापरात बदल करण्यात आलेला असल्यास त्या वेळी भरलेली अनर्जित उत्पन्नाची किंवा अधिमूल्याची रक्कम नव्या रुपांतरण अधिमूल्यात कोणत्याही परिस्थितीत समायोजित अथवा वजा केली जाणार नसल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

रुपांतरण अधिमूल्याची गणना विविध प्रकारांनुसार करण्यात येणार असून,यापूर्वी हस्तांतरण किंवा वापर बदल न झालेल्या प्रकरणांमध्ये नगरपालिका किंवा नगरपंचायत तसेच सीमावर्ती क्षेत्रांतील शेती प्रयोजनासाठी वापरलेल्या जमिनींसाठी जमिनीच्या मूल्याच्या ३० टक्के अधिमूल्य आकारले जाणार आहे. औद्योगिक व बिगरशेती वापरासाठी हे प्रमाण २५ टक्के राहील.नगरपालिका व नगरपंचायत क्षेत्रांबाहेरील जमिनींसाठीही शेती वापरावर ३० टक्के आणि बिगरशेती वापरावर २५ टक्के अधिमूल्य आकारले जाणार आहे.

तसेच,पूर्वपरवानगीने हस्तांतरण झालेल्या अथवा वापरात बदल झालेल्या प्रकरणांमध्ये नगरपालिका व सीमावर्ती क्षेत्रांतील शेती प्रयोजनासाठी वापरलेल्या जमिनींसाठी जमिनीच्या मूल्याच्या २५ टक्के,तर औद्योगिक व बिगरशेती वापरासाठी २० टक्के अधिमूल्य निश्चित करण्यात आले आहे.

दरम्यान,शेतकऱ्यांची गैरसोय टाळण्यासाठी प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला असून,अर्जदारांना जमिनीचे मूल्यांकन स्वतः दुय्यम निबंधक कार्यालयातून आणण्याची आवश्यकता राहणार नाही.अर्ज प्राप्त झाल्यानंतर संबंधित तहसीलदार स्वतः शासकीय स्तरावर दुय्यम निबंधक कार्यालयाकडून अधिकृत वार्षिक दर विवरणपत्रानुसार मूल्यांकन अहवाल मागविणार आहेत.मात्र,संबंधित सिलींग जमिनीच्या चालू ७/१२ उताऱ्यावर पीकपेरा अद्ययावत असल्याची खात्री करणे भूधारकांसाठी बंधनकारक राहील.

शेतकऱ्यांचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर महसूल प्रशासनाकडून जमिनीच्या तपशीलांची तसेच अटी-शर्तींच्या उल्लंघनाची सविस्तर पडताळणी करण्यात येणार असून,त्यानंतर परिपूर्ण प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्यात येतील.यासाठी सर्व तहसीलदारांना आवश्यक निर्देश देण्यात आले आहेत.त्यामुळे जिल्ह्यातील सर्व पात्र शेतकऱ्यांनी तातडीने आपल्या तालुक्याच्या तहसीलदार कार्यालयाशी संपर्क साधून अर्ज सादर करावेत,असे आवाहन अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील यांनी केले आहे.

## रेल्वेच्या विकासाने सांजा गाव उद्ध्वस्त? ब्लास्टिंगने घरांना तडे, तर शेतकऱ्यांचे रस्ते बंद करून प्रशासनाचा 'विकास'!

धाराशिव(रामेश्वर डोंगरे )-तुळजापूर-धाराशिव रेल्वे कामामुळे ग्रामस्थ संतप्त; घरांचे नुकसान, शेतकऱ्यांचा मार्ग बंद जिल्हाधिकारी कार्यालयात नागरिकांत संताप व्यक्त केला जात आहे.

तुळजापूर-सोलापूर-धाराशिव रेल्वे मार्गाचे काम सध्या मोठ्या वेगाने सुरू असून शासनाकडून हा प्रकल्प विकासाचा महामार्ग म्हणून मांडला जात आहे. मात्र या विकासकामामुळे सांजा गावातील नागरिक आणि शेतकरी अक्षरशः संकटात सापडले असून आता ग्रामस्थांचा संताप उफाळून आला आहे.

एका बाजूला रेल्वे कामासाठी सुरू असलेल्या भीषण ब्लास्टिंगमुळे गावातील अनेक घरांना मोठमोठे तडे गेले आहेत, तर दुसऱ्या बाजूला शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी असलेले पारंपरिक रस्ते रेल्वे प्रशासनाने बंद केल्याने शेतकरी मोठ्या अडचणीत आले आहेत. त्यामुळे हा विकास की विनाश? असा संतप्त सवाल आता ग्रामस्थांकडून उपस्थित केला जात आहे.

**ब्लास्टिंगने हादरले सांजा गाव**

रेल्वे मार्गाच्या कामासाठी डोंगर फोडण्यासाठी दररोज मोठ्या प्रमाणात ब्लास्टिंग केले जात आहे. या स्फोटांच्या तीव्र कंपनांचा फटका थेट गावातील घरांना बसत असून अनेक घरांच्या भिंतींना तडे गेले आहेत. काही घरांची अवस्था इतकी गंभीर झाली आहे की नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, अचानक होणाऱ्या स्फोटांमुळे लहान मुले, वृद्ध आणि महिलांमध्ये प्रचंड घबराट निर्माण होत आहे. घरातील वस्तू हलणे, छताला भगदाड पडणे आणि भिंतींना तडे जाणे असे प्रकार सातत्याने घडत आहेत. अनेक वेळा तक्रारी करूनही संबंधित कंत्राटदार आणि अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

**शेतकऱ्यांचे रस्ते बंद; शेतीपर्यंत पोहोचणे कठीण**

ब्लास्टिंगच्या प्रकरणाची धग कायम असतानाच आता आणखी एक गंभीर प्रश्न समोर आला आहे. रेल्वे रुळाच्या कामामुळे शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी सोडलेले रस्ते बंद करण्यात आले आहेत. त्यामुळे ट्रॅक्टर, बैलगाडी किंवा शेतीची साधने घेऊन जाणे कठीण झाले असून शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले आहेत. पावसाळ्याच्या तोंडावर शेतीची कामे सुरू असताना रस्ते बंद झाल्यामुळे शेतकऱ्यांचा संताप अनावर झाला आहे. अखेर संतप्त शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय गाठून आपली व्यथा मांडली. प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही शेतकऱ्यांनी दिला आहे. या बाबीकडै जिल्हाधिकारी यांनी लक्ष देण्याची गरज आहे

### जागा वाटणीचे कारणावरुन शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, मारहाण करुन गंभीर जखमी केले

परंडा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत शामसुंदर, सुरज , दोघे रा. नृसिंहनगर परंडा ह.मु. पुणे, प्रदीप, रितेश रा. कार्ला ता. औसा जि. लातुर यांनी दि.२०.०५.२०२६ रोजी सु. नृसिंहनगर परंडा येथे फिर्यादी नामे-मधुसुदन कानिफनाथ ताटे, वय ४३ वर्षे, रा. नृसिंहनगर परंडा ता. परंडा जि. धाराशिव यांना नमुदांनी जागा वाटणीचे कारणावरुन शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, मारहाण करुन गंभीर जखमी केले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-मधुसुदन ताटे यांनी दि.२२.०५.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो ठाणे परंडा येथे भा.न्या. सं.कलम ११७(२), ११५(२), ३५२, ३(५) गुन्हा नोंदवला आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे लक्ष द्या

या वर्षी समाधानकारक पावुस होणार असल्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. काही भागात पावसाने सुरवात बऱ्यापैकी केली आहे. सुरवातीचे वातावरणतर समाधानकारक दिसून येत आहे. अशा स्थितीत शेतकरी मृगनक्षत्रावर पेरणी करण्यात सुरवात करणार आहे. त्यापुर्वी शेतीत पेरणीयोग्य बियाणे व खताची गरज भासते. ते वेळेवर, मुबलक प्रमाणात मिळाली पाहिजेत. काही झाले तरी बियाणेची कमतरता भासू न देणे ही काम सरकारचे आहे. या काळात खता बरोबर बियाणेंचा काळाबाजार मोठ्या प्रमाणात होत असतो. हे दरवर्षी होते. कृषी विभागास सतर्कता करण्यात येत असते. पथक नेमण्यात आलेली असतात. फर्टीलायझरच्या दुकानाची तपासणी होत असते. स्टॉक तपासला जात असतो. अशा स्थितीत सुद्धा काळाबाजार होत असल्याची टिका होते. ती सार्थक आहे का निरर्थक आहे हे सर्वाना माहिती आहे. तरी शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे गांर्भीयाने पाहिले जात नाही. शेतकरी असा व्यक्ती आहे की, प्रामाणिक आहे, आंदोलन करीत नाही, अंगात फाटके कपडे घातलेले असते. त्यामुळे सहसा कोणी किंमत देत नाहीत, मात्र तो जगाचा पोशिंदा आहे म्हणून माजी पंतप्रधान शेतकऱ्याचे कैवारी लाल बहादुर शास्त्री यांनी जय किसानचा नारा दिला. त्यांनी देशासाठी अतिमहत्त्वाचे दोन व्यक्ती आहेत. एक जवान दुसरा किसान, त्यामुळे 'जय जवान जय किसान' चा नारा दिला होता. त्यांनतर कोणीही शेतकऱ्याकडे लक्ष दिले नाही. दिले मात्र नाममात्र! त्यामुळे आता पेरणीचा काळ आहे. पेरणी व्यवस्थिती झाल्यातरच समाधानाचे वातावरण निर्माण होते. चोऱ्या, लुटमार होत नाहीत. हवामान तज्ज्ञ तर या वर्षीचे सालमान चांगले असल्याचे मत व्यक्त केले आहेत. त्यापुर्वी शेतकऱ्यांना पेरणीसाठी काय-काय लागते याचा विचार करून पुरवठ्यासाठी स्टॉकची गरज आहे. शेतकऱ्याने एकदा पेरणी केली की, मोठा आनंदीत दिसून येतो. शेतकरी हा समाधानी असला पाहिजे. त्यासाठी सरकारने सतत प्रयत्नाची गरज आहे. आता सरकारकडून कर्ज माफी आदिची घोषणा करण्याच्या तयारीत आहे असे दिसते. मुळात कर्ज देणे व कर्जबाजारी करणे हा मोठा विषय आहे. यात जाणेच योग्य नाही. कर्ज देवून माफीची सवय लावणे योग्य नाही. राज्यातील शेती ही निसर्गावर आवलंबुन राहीली आहे. पुर्वी सारखा पावुस होत नाही. एक तर कॉंक्रेटची जंगले निर्माण केल्याने जमिनीत पाणी पुरले जात नाही. त्यामुळे उन्हाळ्या तिव्र पाणी टंचाईला समोरे जावे लागते. दरवर्षी उन्हाळा तिव्र होत आहे. त्यामुळे सरकारने एकतर कठोर निर्णय घेवून वृक्षारोपनाबाबत नियमावली बनविण्याची गरज आहे. याचे ऑडीट झाले पाहिजे. काही झाले तरी किती झाडे लावली, किती जगली याचे कोठेही मोजमाप नाही. तसेच शेतकऱ्याबाबत होते. शेतकऱ्याकडे माल आला की, त्यामालाच्या किंमती घसरल्या जातात. सोयाबिनचे दर आता वाढले. ज्यावेळी शेतकऱ्याकडे सोयाबिन होते त्यावेळी दर कोसळलेले असतात. याचा लाभ तेल उद्योग व्यापारी घेतात. दु:खाने म्हणावे लागते की, कवडीमोल दराने सोयाबिन विकावे लागते. तेच व्यापारी, तेल उद्योजक खरेदी करतात. ज्यावेळी तेल काढले जाते त्यावेळी इतर उरलेला माल मोठ्या दराने विकाला जातो. असो यात न जाता शेतकऱ्याचे आर्थिक जीवनमान का सुधारत नाही या बाबत विचार करणे आवश्यक आहे. सर्वात महत्त्वाचा काळ हा पेरणीचा असतो. यावेळी बोगस बियाणे माथी मारले जाते. शेतकऱ्यास  बोगस आहे का दर्जेदार आहे हे कळत नाही. या बाबत कृषी विभागच कार्यक्षम असला पाहिजे. आठ महिणे कार्यालयात असणारे अधिकारी, कर्मचारी या सुगीच्या दिवसात बाहेर पडले पाहिजेत. पेरणीच्यावेळी वेळेवर खते, बियाणे मिळाले तर पेरणीची मेहनत वाया जात नाही. नसता दुबार पेरणी करण्याची वेळ येते. हा मोठा आर्थिक झटका बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे वर्षभर काय कृषी विभाग करतो यात न जाता केवळ पेरणीच्यावेळी सतर्क असावा ही मोठी अपेक्षा आहे. बाजारात कोणत्या कंपन्याचे दर्जेदार बियाणे आहेत. खते कोणती वापरावित याची माहिती कृषी विभागाला असते. शेतकऱ्यासाठीच असलेला हा विभाग कायम स्वरुपी सतर्क असता तर शेतकरी आर्थिक संकटात सापडला जात नाही. त्याला कृषी विभाग चांगले मार्गदर्शन करीत नाही. लालबहादुर शास्त्रीसारख्या विचाराच्या व्यक्ती सध्याला नाहीत. चीनमध्ये पहिल्यांदा देशभर छोटे-मोठे कॅनलरूपात, नद्या जोड करून पाणी फिरविले. पहिले पंतप्रधानाने एकवेळेस जेवन केले आहे. जो पर्यंत त्यागी भावना निर्माण होणार नाही तो पर्यंत शेतकऱ्याचे आर्थिक जीवन मान सुधारणार नाही. बरेच मंडळी अतिषश कमी पावुस पडत असलेला देश ईस्त्राईलचे उदा. देतात मात्र या ईस्त्राईलची, चीनची शेतकऱ्याबाबत किती अस्था, प्रेम व आपुलकी आहे हे लक्षात घेत नाही. कमी पावसाच्या पाण्यात भरघोष उत्पन्न काढतात. उदा. देणे ठिक आहे. त्या देशातील सर्वात महत्वाचा भाग, खाते हे कृषी आहे हे लक्षात घेतले पाहिजे. तसे आपल्या भारतात नाही. मुळात एक-एकदा असे वाटते की, आपल्या देशातील कृषी विभाग चालू ठेवणे योग्य आहे का? दुसरे असे वाटते इतर देशातील हवमान विभाग हा अंदाज सांगत नाही तर पक्का अंदाज सांगतात, तसे आपल्या देशात का होत नाही. अंदाज हा चुकीचा होवू शकतो. अंदाज या शब्दाचा अर्थ लबाडही होवू शकतो. पावुस पडला तर अंदाज खरा, नाही पडला तर खोटा! असे यापुढे तर होवू नये. शेतीसाठी अंदाज नको तर पक्केधोरणाची गरज आहे. हे लक्षात घेतले पाहिजे. त्यामुळे शेतकऱ्यांना सहकार्य करण्याची वेळ आली असून या मृगनक्षात चांगली पेरणी, उत्पादन मिळाले तर राज्यात समाधानाचे दिवस दिसून येतात. आनंदी ग्रामीण भाग दिसून येईल. त्यामुळे सरकारने कडक धोरण स्विकारून कृषी विभागाला कामाला लावले पाहिजे. दर्जेदार बियाणे व खताची उपलब्धता करून दिली पाहिजे. किमान या पेरणीच्या काळात सरकारने सर्वोपरि लक्ष देण्याची गरज आहे. काही झाले तरी शेतकऱ्यास कोणतीही आडचण येवू नये याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

# होंडाची नवीन अपडेटेड सिटी लॉन्च, सुरुवातीची किंमत १२ लाख



होंडा कार्स इंडियाने अखेरीस भारतात आपली लोकप्रिय सेडान कार सिटीची अपडेटेड आवृत्ती लॉन्च केली आहे. याची सुरुवातीची किंमत १२ लाख (एक्स-शोरूम) ठेवण्यात आली आहे.

कंपनीने या कारच्या लुक आणि फीचर्समध्ये अनेक महत्त्वाचे बदल केले आहेत, जेणेकरून बाजारात मिळत असलेल्या तीव्र स्पर्धेमध्ये याला पूर्णपणे नवीन लुक देता येईल.

**बाहेरून कार किती बदलली: सुधारित ग्रिल आणि नवीन अलॉय व्हील्स**

डिझाइनबद्दल बोलायचे झाल्यास, होंडाने कारचा लुक आधीपेक्षा थोडा अधिक शार्प केला आहे. याच्या पुढील भागात सुधारित ग्रिल, नवीन बंपर डिझाइन आणि नवीन अलॉय व्हील्स देण्यात आले आहेत.

कारच्या डएऊलाइटिंग एलिमेंट्समध्येही बदल करण्यात आले आहेत, ज्यामुळे याचा लुक खूप स्वच्छ दिसतो. मात्र, कंपनीने याचा जुना सिग्नेचर लुक कायम ठेवला आहे.

**केबिन आणि फीचर्स: टचस्क्रीन आणि डव्हान्स कनेक्टेड कार टेक्नॉलॉजी**

कारच्या आतील लेआउट पूर्वीसारखाच ठेवण्यात आला आहे, पण फीचर्सच्या यादीत नवीन अपडेट्स जोडण्यात आले आहेत. यात स्मार्टफोन कनेक्टिव्हिटीसह मोठी टचस्क्रीन इन्फोटेनमेंट सिस्टम, डिजिटल ड्रायव्हर डिस्प्ले, कनेक्टेड कार टेक आणि सनरूफ यांसारखी वैशिष्ट्ये मिळतील.

**नवीन होंडा सिटीच्या व्हेरिएंटनुसार किमती**

| सिटी व्हेरिएंट | किंमती (दिल्ली एक्स-शोरूम) |
|---|---|
| पेट्रोल MT SV | ११.९९ लाख |
| पेट्रोल MT V | १३.२९ लाख |
| पेट्रोल MT ZX | १५.२५ लाख |
| पेट्रोल MT ZX+ | १६.१४ लाख |
| पेट्रोल CVT V | १४.२९ लाख |
| पेट्रोल CVT ZX | १६.२५ लाख |
| पेट्रोल CVT ZX+ | १७.१४ लाख |
| स्ट्राँग हायब्रिड ZX+ | २०.९९ लाख |

**सुरक्षिततेमध्ये काय खास आहे: होंडा सेन्सिंग सूटसह ADAS**

कार सुरक्षित बनवण्यासाठी होंडाने आपल्या प्रेझेंटेशनदरम्यान ADAS (ॲडव्हान्स्ड ड्रायव्हर असिस्टन्स सिस्टीम) पॅकेजवर विशेष भर दिला आहे.

नवीन अपडेटेड सिटीमध्ये ग्राहकांना पूर्वीप्रमाणेच 'होंडा सेन्सिंग सूट'चा सपोर्ट मिळत राहील, जो प्रवासादरम्यान सुरक्षितता सुधारतो.

**इंजिन आणि गिअरबॉक्स:** जुने १.५-लिटर पेट्रोल इंजिनच मिळेल

यांत्रिकदृष्ट्या कारमध्ये कोणताही बदल केलेला नाही. अपडेटेड सिटीमध्ये जुनेच १.५-लिटर नॅचरल एस्पिरेटेड पेट्रोल इंजिन देण्यात आले आहे.

हे इंजिन मॅन्युअल आणि उतढ गिअरबॉक्स दोन्ही पर्यायांसह येते. कंपनीने यावेळी पॉवरट्रेनमध्ये कोणताही बदल केलेला नाही, यावरून स्पष्ट होते की त्यांचे संपूर्ण लक्ष कारचा लूक आणि आकर्षण वाढवण्यावर होते.

**या गाड्यांशी थेट स्पर्धा: वर्ना आणि स्लाव्हियाला टक्कर**

मिडसाईज सेडान सेगमेंटमध्ये आपली मजबूत पकड कायम ठेवण्यासाठी कंपनीने यात रिफ्रेश्ड फ्रंट-एंड स्टाइलिंग, नवीन अलॉय व्हील्स आणि डव्हान्स कनेक्टेड फीचर्स दिले आहेत.

भारतीय बाजारात लॉन्च झाल्यानंतर या अपडेटेड होंडा सिटीची थेट स्पर्धा ह्युंदाई वर्ना, फोक्सवॅगन व्हर्टूस आणि स्कोडा स्लाव्हिया सारख्या गाड्यांशी होईल.

# सबस्क्रिप्शनचे 'चक्रव्यूह', ग्राहकांचे नुकसान

सब्रुकलिनमधील ३५ वर्षीय सॉफ्टवेअर अभियंता एलेनोर लुईची कथा आज प्रत्येक दुसऱ्या व्यक्तीची कथा आहे. एलेनोर दरमहा अशा व्हिडिओ गेमसाठी पैसे देत आहे, ज्यात तिला कोणतीही रुची नाही. ती म्हणते, 'मी ५ वर्षांपासून हा गेम खेळलेला नाही. पण यातून सुटका कशी करावी हे समजत नाहीये...'

हे तर फक्त एक उदाहरण आहे. जर तुम्ही क्रेडिट कार्डचे स्टेटमेंट किंवा यूपीआयची ऑटो-डेबिट हिस्ट्री तपासली, तर तुम्ही थक्क व्हाल. तिथे एक लांब यादी मिळेल - स्ट्रीमिंग प्स, क्लाउड स्टोरेज, ई-कॉमर्स साइट्सची प्राइम मेंबरशिप, जिम आणि फिटनेस प्स आणि अगदी आरओ मशीन देखील... सर्व काही सबस्क्रिप्शन मॉडेलवर आले आहे. आणि तर आता 'सबस्क्रिप्शन'च्या आतही आणखी एक सबस्क्रिप्शन लपलेले असते.

कोणत्याही ओटीटी प्लॅटफॉर्मचा बेस पॅक घ्या, मग त्यात जाहिरातींशिवाय कंटेंट किंवा लाइव्ह स्पोर्ट्स पाहण्यासाठी 'प्रीमियम'चा खर्च वेगळा. आणि कोणता रिचार्ज कधी संपत आहे हे लक्षात ठेवण्यासाठी - सर्व सबस्क्रिप्शन ट्रॅक करणाऱ्या आणखी एका पची मेंबरशिप घ्यावी लागते.

ब्रिटिश प्लॅटफॉर्म 'बॅंगो' च्या अभ्यासानुसार, ब्रिटन आणि अमेरिकेतील एक सामान्य व्यक्ती दरमहा सुमारे ५,७०० ते १६ हजार रुपये खर्च करत आहे. हार्वर्ड बिझनेस स्कूलच्या अहवालानुसार, थेट ग्राहकांना वस्तू विकणाऱ्या ७५% कंपन्यांनी सबस्क्रिप्शन मॉडेल स्वीकारले आहे. जॉर्ज वॉशिंग्टन युनिव्हर्सिटीचे प्रा. गिल पल म्हणतात, कंपन्या हुशारीने वस्तू वेगवेगळ्या



विकतात. उदा. दही खरेदी करा पण चमचा सबस्क्रिप्शनवर घ्या. सामान्यतः हे शक्य नाही, पण प्सच्या जगात हे सामान्य आहे.

याचा सर्वात गुंतागुंतीचा पैलू 'रद्द करणे' आहे. कंपन्यांच्या प्समध्ये 'सबस्क्राईब' करणे सोपे असते, पण ते बंद करणे अत्यंत कठीण असते. याची प्रक्रिया लांब आणि गुंतागुंतीची असते किंवा कस्टमर केअरवर बराच वेळ वाट पाहावी लागते. प्रा. पल म्हणतात, 'पुढच्या वेळी जेव्हा तुम्ही एखाद्या पवर 'स्टार्ट सबस्क्रिप्शन' वर क्लिक कराल, तेव्हा लक्षात ठेवा- सुरुवात सोपी वाटेल, पण दरमहा कापला जाणारा छोटासा भाग कंपन्यांना शक्तिशाली आणि तुम्हाला असहाय्य बनवेल.'

**स्टेटमेंटचे ऑडिट करा, वार्षिकऐवजी मासिक योजना चांगली**

अमेरिकन फायनान्स तज्ज्ञ आणि 'आय विल टीच यू टू बी रिच' चे लेखक रमित सेठी यांच्या मते, सबस्क्रिप्शनच्या चक्रव्यूहातून बाहेर पडण्याचा सर्वात प्रभावी मार्ग म्हणजे जागरूकपणे खर्च करणे हा आहे. तुमच्या बँक स्टेटमेंटचे 'निर्दयी ऑडिट' करा, ज्या सेवेचा वापर ३० दिवसांत केला नाहीये, तिला विचार न करता लगेच रद्द केले पाहिजे. कोणत्याही 'फ्री ट्रायल'साठी साइन-अप करताच ते लगेच रद्द करा, जेणेकरून ट्रायल कालावधीचा फायदाही घेता येईल आणि भविष्यात चुकून कापल्या जाणाऱ्या पैशांपासूनही वाचता येईल. वार्षिक सवलतीऐवजी मासिक योजना चांगली आहे कारण दर महिन्याला खिशातून जाणारे पैसे तुम्हाला जागरूक ठेवतात.

# चॅटजीपीटी AI फोन लॉन्च करू शकते

चॅटजीपीटी सामान्य लोकांसाठी खुले होऊन आता तीन वर्षांपेक्षा जास्त काळ झाला आहे आणि या काळात खूप काही बदलले आहे. चॅटजीपीटी आणि जेमिनीसारखे एआय एलएलएम आता फक्त प्रश्नांची उत्तरे देण्यापुरते मर्यादित राहिलेले नाहीत, तर असे एजंट बनत आहेत जे जटिल काम सोपे करू शकतात, त्यांना वेगवान करू शकतात किंवा काही कामे स्वतःच सांभाळू शकतात. तर आता ओपनएआयसाठी पुढचे पाऊल काय आहे? सॅम अल्टमन यांच्या नेतृत्वाखालील ही कंपनी एआय मॉडेल्स आणि एजंट्सनंतर 'एआय एजंट फोन' बनवण्याच्या तयारीत आहे.

**एआय हार्डवेअरचा नवा टप्पा**

ओपनएआयचे मोठे उत्पादन असा स्मार्टफोन असू शकतो, जो एक एआय फोन असेल आणि फोन वापरण्याची पद्धतच बदलू शकतो. या शर्यतीत ओपनएआय एकटे नाही. इतर कंपन्याही एआयला लक्षात घेऊन नवीन उपकरणे बनवत आहेत. मेटास्टॅट रिसर्चनुसार, एआय गॅजेट्सचा बाजार २०३२ पर्यंत दरवर्षी सुमारे २४% च्या वेगाने वाढू शकतो. या दिशेने आता वेग दिसू लागला आहे, जिथे ओपनएआय आणि पलसारख्या कंपन्या स्वारस्य दाखवत आहेत. चला, एआयवर लक्ष केंद्रित केलेल्या काही आगामी गॅजेट्सबद्दल जाणून घेऊया.

**लवकरच लॉन्च होतील हे एआय डिव्हाइसेस**

चॅटजीपीटी फोन - ६ मुद्द्यांवरून समजून घ्या कसा असेल

- त्याचा इंटरफेस अँड्रॉइड आणि आयओएसपेक्षा वेगळा असू शकतो.

- या फोनमध्ये प-आधारित प्रणालीऐवजी टास्क-आधारित इंटरफेस असू शकतो, जिथे बहुतेक काम चॅटजीपीटी किंवा त्याचे प्स सांभाळतील.

- उदाहरणार्थ, सकाळी उठून तुम्ही फोनवरून सर्व अपडेट्स घेऊ शकता. फोन स्वतः ईमेलला उत्तर देऊ शकेल, कॉल करू शकेल आणि किराणा ऑर्डरही स्वतः करू शकेल, म्हणजेच स्क्रोल करण्याऐवजी तुम्ही फोनला काम सोपवू शकाल.

- यात मीडियाटेक डायमेंसिटी ९६०० प्रोसेसर, दोन छझण (एआय प्रोसेसिंग युनिट) असण्याची शक्यता आहे.

- कॅमेरा देखील आजूबाजूला स्कॅन करून उत्तर देण्यासाठी वापरला जाईल.

- विश्लेषक मिंग ची कुओ यांच्या मते, फोन २०२७ पर्यंत लॉन्च होऊ शकतो आणि पहिल्या वर्षात सुमारे ३ कोटी युनिट्स विकले जाण्याचा अंदाज आहे.

**ओपनएआय स्मार्ट पिन**

ओपनएआयचे हे एक स्क्रीनलेस वेअरेबल असेल, ज्यात मायक्रोफोन, कॅमेरा आणि स्पीकर असू शकतो. हे आजूबाजूच्या गोष्टी रेकॉर्ड करून चॅटजीपीटीला देईल आणि याच्याशी संवाद साधता येईल.

# मोटोरोला रेझर फोल्ड प्रीमियम स्मार्टफोन भारतात लाँच

### ५०MP चे तीन मागील कॅमेरे आणि ८.१ इंच 2K डिस्प्ले, सुरुवातीची किंमत १.५० लाख



टेक कंपनी मोटोरोलाने भारतात आपला सर्वात प्रीमियम फोल्डेबल स्मार्टफोन मोटोरोला रेझर फोल्ड लॉन्च केला आहे. याची सर्वात मोठी खासियत म्हणजे याचा ८.१-इंचचा फोल्डेबल डिस्प्ले आणि लेटेस्ट स्नॅपड्रॅगन ८ जेन ५ प्रोसेसर आहे.

हा फोन ५० मेगापिक्सलच्या तीन रियर कॅमेऱ्यांसह आला आहे. मोटोरोलाने हा रेझर फोल्ड दोन स्टोरेज व्हेरिएंट आणि एका स्पेशल एडिशनसह बाजारात आणला आहे. याची किंमत १.५० लाखांपासून सुरू होते.

**मोटोरोला रेझर फोल्ड: व्हेरिएंटनुसार किंमत**

| व्हेरियंट | किंमत |
|---|---|
| 12GB रॅम + 256GB स्टोरेज | १,४९,९९९ |
| 16GB रॅम + 512GB स्टोरेज | १,५९,९९९ |
| फिफा वर्ल्ड कप २०२६ एडिशन | १,६९,९९९ |

लॉन्च ऑफरमध्ये १०,००० रुपयांचा इन्स्टंट बँक डिस्काउंट किंवा एक्सचेंज बोनस मिळेल. तसेच १८ महिन्यांपर्यंत नो-कॉस्ट एचख चा पर्याय देखील आहे. २० जूनपर्यंत फोन खरेदी करणाऱ्यांना १ वर्षासाठी 'फ्री वन-टाइम स्क्रीन रिप्लेसमेंट'ची सुविधा मिळेल. फोनचे प्री-ऑर्डर सुरू झाले आहेत.

**डिझाइन आणि बिल्ड क्वालिटी: फोल्ड केल्यावरही खूप स्लिम**

मोटोरोला रेझर फोल्डचे डिझाइन खूप प्रीमियम आणि स्लीक आहे. उघडल्यावर त्याची जाडी फक्त ४.५५ा राहते, ज्यामुळे ते पकडताना खूप हलके वाटते.

**साहित्य आणि अनुभव:** फोन बनवण्यासाठी उच्च-श्रेणीचे ल्युमिनियम आणि काच वापरले आहे. त्याचे वजन २४३ ग्रॅम आहे. मागील पॅनलवर प्रीमियम पोत (टेक्सचर) दिले आहे, जे हातात चांगली पकड देते.

**डिस्प्ले मांडणी:** समोरच्या बाजूला कव्हर डिस्प्लेसह पातळ बेझल्स दिले आहेत. दुमडल्यावर ते खूप कॉम्पॅक्ट होते.

**बटणे आणि पोर्ट्स:** यात टाइप-सी चार्जिंग पोर्ट, सिम ट्रे आणि स्पीकर ग्रिल खालच्या बाजूला आहेत. पॉवर बटणामध्येच फिंगरप्रिंट सेन्सर दिला आहे.

**IP रेटिंग:** पाणी आणि धुळीपासून संरक्षणासाठी याला खझ४८ आणि खझ४९ रेटिंग मिळाली आहे.

**स्पेसिफिकेशन्स:** डिस्प्लेपासून परफॉर्मन्सपर्यंत सर्व 'एक्स्ट्रीम'

**१. डिस्प्ले:** दोन स्क्रीन आणि १२०कू रिफ्रेश रेट

**मुख्य डिस्प्ले:** ८.१-इंच LTPO एक्सट्रीम एमोलेड पॅनल, 2K रिझोल्यूशन (२४८४ x २२३२ पिक्सेल). यात १२०Hz रिफ्रेश रेट आणि ६२०० निट्सची पीक ब्राइटनेस मिळते.

**कव्हर डिस्प्ले:** ६.६-इंचची स्क्रीन आहे जी १६५Hz रिफ्रेश रेट आणि ६००० निट्स ब्राइटनेसला सपोर्ट करते. दोन्ही डिस्प्लेवर डॉल्बी व्हिजनचा सपोर्ट आहे.

**२. कॅमेरा:** ट्रिपल 50MP सेटअप

**मागील कॅमेरा:** 50MP सोनी LYTI- 828 प्रायमरी सेन्सर, ५०चझ अल्ट्रावाइड आणि 50MP सोनी LYTI- 600 पेरिस्कोप टेलीफोटो लेन्स (उत्तम झूमसाठी). हे 8K व्हिडिओ रेकॉर्डिंगला सपोर्ट करते.

**सेल्फी कॅमेरा:** फोल्ड केल्यावर बाहेर २०चझ आणि उघडल्यावर आतमध्ये 32MP चा कॅमेरा दिला आहे.

**३. परफॉर्मन्स आणि सॉफ्टवेअर**

**प्रोसेसर:** यात जगातील सर्वात वेगवान स्नॅपड्रॅगन ८ जेन ५ प्रोसेसर आहे, जो 3nm तंत्रज्ञानावर आधारित आहे.

**सॉफ्टवेअर:** फोन अँड्रॉइड १६ वर चालतो आणि कंपनीने यासोबत ७ वर्षांच्या OS अपडेट्सचे वचन दिले आहे.

AI वैशिष्ट्ये: यात मोटो AI टूल्स जसे की कॅच मी अप, रिकॉल आणि इमेज स्टुडिओ दिले आहेत. गुगल जेमिनीचा इन-बिल्ट सपोर्ट देखील मिळतो.

**४. पॉवरबॅकअप: 6000mah** ची मोठी बॅटरी

**बॅटरी:** फोल्डेबल फोन असूनही, यात 6000mah ची मोठी सिलिकॉन-कार्बन बॅटरी देण्यात आली आहे.

**चार्जिंग:** हे 80W वायर्ड आणि 50W वायरलेस चार्जिंगला सपोर्ट करते. कंपनीचा दावा आहे की, एकदा चार्ज केल्यावर हे ४३ तासांपेक्षा जास्त बॅकअप देऊ शकते.

# आयटेल A100C स्मार्टफोन लाँच, किंमत ७,९९९



टेक कंपनी आयटेलने आपला नवीन स्टायलिश स्मार्टफोन A100C न्यू लॉन्च केला आहे. कंपनीने हा फोन खास अशा लोकांसाठी सादर केला आहे, ज्यांना कमी बजेटमध्ये मजबूत आणि उत्तम फीचर्स असलेला फोन हवा आहे.

या स्मार्टफोनची सर्वात मोठी खासियत म्हणजे त्याची मजबुती. याला मिलिटरी ग्रेड सर्टिफिकेशन (MIL-STD-810H) मिळाले आहे, जे त्याला पडण्यापासून किंवा धक्क्यांपासून खराब होण्यापासून वाचवते. CMR ड्युरेबिलिटी इंडेक्स रिपोर्ट २०२६ नुसार, आयटेल १० हजार रुपयांपेक्षा कमी किमतीच्या सेगमेंटमध्ये देशातील सर्वात विश्वासार्ह आणि टिकाऊ ब्रँड म्हणून उदयास आला आहे.

आयटेल A100C न्यू स्मार्टफोनची भारतात किंमत ७,९९९ रुपये ठेवण्यात आली आहे. कंपनीने हा सिल्क ग्रीन, टायटॅनियम गोल्ड आणि प्योर ब्लॅक अशा तीन कलर ऑप्शनसह बाजारात आणला आहे.

# हल्लेखोराची हत्या

हे हल्ले कोणी घडवले, का घडवले हे उघड झाले नाही. त्यामुळे हमजा बुरहान याच्या हत्येमागे कोण आहे आणि कोणत्या कारणाने त्याची हत्या झाली, हे प्रश्न अनुत्तरित राहतात.

सन २०१९ मध्ये झालेल्या पुलवामा हल्ल्यातील एक सूत्रधार हमजा बुरहान याची व्याप्त काश्मीरमध्ये गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. हत्या कोणी केली, का केली, याचे तपशील अद्याप जाहीर झाले नसले तरी बुरहान याने केलेल्या कृष्णकृत्याची शिक्षा त्याला मिळाली आहे. केंद्र सरकारने २०२२ मध्ये बुरहानला अतिरेकी म्हणून घोषित केले होते. तो अर्जुमंद गुलजार, ऊर्फ हमजा बुरहान ऊर्फ डॉक्टर अशा वेगवेगळ्या नावाने ओळखला जात होता. जम्मू काश्मीरमधील पुलवामामधील खरबतपोरा, रत्नीपोरामधील येथील मूळचा रहिवासी असलेला हमजा बुरहान कायदेशीर मार्गाने पाकिस्तानात गेला आणि तेथील अल बद्र या दहशतवादी संघटनेचा सदस्य बनला. या संघटनेच्या माध्यमातून पाकिस्तानमध्ये राहून तो भारतात दहशतवादी कारवाया घडवून आणत होता.



जम्मू काश्मीरच्या पुलवामा जिल्ह्यात फेब्रुवारी २०१९ मध्ये पाकिस्तानातील जैश ए महमद या संघटनेच्या दहशतवाद्यांनी स्फोटकांनी भरलेली मोटार केंद्रीय राखीव पोलिसांच्या ताफ्यावर धडकवून हा हल्ला घडवून आणला होता, त्यात राखीव दलाच्या ४० जवानांना हौतात्म्य आले. राष्ट्रीय तपास यंत्रणेने या हल्ल्याच्या सूत्रधाराचा शोध घेऊन बुरहान याचा त्यात सहभाग असल्याचे स्पष्ट केले होते. उच्च शिक्षणाच्या नावाखाली बुरहान पाकिस्तानात गेला होता. स्वतःला शिक्षक म्हणवून घेणारा बुरहान प्रत्यक्षात दहशतवाद्यांची भरती, त्यांना प्रशिक्षण देणे अशा प्रकारांत सहभागी होता. त्याच्यावरील हल्ल्यामुळे हफीज सईद, मसूद अजहर यांसारख्या दहशतवाद्यांना ते सुरक्षित नाहीत, असा संदेश गेला आहे. हमजा बुरहानचा खात्मा म्हणजे पुलवामा हल्ल्यात बळी गेलेल्या चाळीस जवानांना श्रद्धांजली आहे. व्याप्त काश्मीरमधील अशा घटनांमुळे दहशतवादी कारवायांना देखील लगाम बसेल. ज्या हमजा बुरहानने पुलवामा हल्ल्याचा कट रचला, तरुणांना भडकावले, स्फोटके पुरवली, आज तोच मारला गेला याचे हुतात्मा झालेल्या जवानांच्या कुटुंबीयांना देखील समाधान लाभले असेल. त्याच्या मृत्यूमुळे पाकिस्तानातील आयएसआयने पाळलेले गुंड दहशतवादीही सुरक्षित नसल्याची भावना आता तेथे पसरली असेल.

टोळी युद्धाचा परिणाम


गेल्या दोन वर्षांत व्याप्त काश्मीरमध्ये काही हवे असलेले (मोस्ट वॉन्टेड) दहशतवादी अज्ञातांच्या गोळीबारात मारले गेले आहेत. अशा हत्यांमुळे दहशतवादी संघटना कमकुवत झाल्या का, की त्यांच्यातील अंतर्गत संघर्षाचा हा परिणाम आहे, असा प्रश्न पडतो. २०१९ मध्ये झालेला पुलवामा हल्ला हा भारताच्या सुरक्षा व्यवस्थेवरील जसा हल्ला होता, तसा देशाच्या सामूहिक मानसिकतेवर झालेला हल्ला होता. पाकिस्तान आणि व्याप्त काश्मीरमध्ये दहशतवादी संघटनांशी संबंधित व्यक्तीवर रहस्यमय हल्ले झाले. अज्ञात बंदूकधार्यांकडून काही दहशतवादी मारले गेले; मात्र हे हल्ले कोणी घडवले, का घडवले हे उघड झाले नाही. त्यामुळे हमजा बुरहान याच्या हत्येमागे कोण आहे आणि कोणत्या कारणाने त्याची हत्या झाली, हे प्रश्न अनुत्तरित राहतात. हमजा बुरहान मारला गेला; पण अजूनही काही दहशतवादी पाकिस्तानात आहेत. त्यांच्यावर कारवाई व्हायला हवी. अल बद्र ही संघटनाही अजून सक्रिय आहे. संयुक्त राष्ट्रात भारताने पाकिस्तानची 'टेरर फॅक्टरी' अशी संभावना केली होती. त्यानंतर अवघ्या चार दिवसांनी हमजा बुरहानची हत्या झाली. अतिरेक्यांबाबतची पाकिस्तानची भूमिका कठोर झाली आहे, हे दाखवण्याचा तर प्रयत्न यामागे नाही ना हेही पाहावे लागेल. आयएसआय विरोधात दहशतवादी यांच्यातील संघर्षाची बाजू लक्षात घ्यावी लागेल. जैश, लष्कर ए तोयबा आणि अल बद्र या दहशतवादी गटामध्येही वर्चस्वाची लढाई सुरू असते त्याचा हा परिणाम आहे का हेही पाहावे लागेल. पाकिस्तानची अतिरेक्यांना आश्रय देण्याची भूमिका बदलली असेल, तर त्यांनी पाकिस्तानातील मसूद अजहरसारख्याना भारताच्या ताब्यात तात्काळ द्यावे. पाकिस्तानातील अतिरेक्यांचे तळ उद्ध्वस्त करावेत, तरच खर्या अर्थाने पाकिस्तानला दहशतवादाच्या विरोधातील लढाई लढायची असल्याचे सिद्ध होईल.

# अभंगवाणी : विद्यावाचस्पती विद्यानंद

**अंतरींची घेतो गोडी । पाहे जोडी भावाची॥१॥**
**देव सोयरा देव सोयरा। देव सोयरा दीनाचा॥ध्रु॥**
**आपुल्याच वैभवें । शृंगारावे निर्मळें॥३॥**
**तुका म्हणे जेवी सवें। प्रेम घ्यावे प्रीतीचें॥४॥**

महाराष्ट्राची संतपरंपरा ही केवळ धार्मिक वारसा नसून ती मानवी जीवनाला दिशा देणारी आध्यात्मिक आणि सामाजिक चळवळ आहे. या परंपरेतील संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगवाणीतून सामान्य माणसाच्या अंतःकरणाशी थेट संवाद साधला. त्यांच्या शब्दांमध्ये कृत्रिमता नाही, दिखाऊपणा नाही; तर त्यात अनुभवातून आलेली सत्यता, भक्तीची निर्मळता आणि समाजजीवनाचे वास्तव प्रतिबिंबित झालेले दिसते. या ओळींमध्ये संत तुकाराम महाराजांनी भक्तीचे अत्यंत सूक्ष्म, पण व्यापक स्वरूप उलगडून दाखवले आहे. या अभंगांचा अर्थ केवळ भक्तीपुरता मर्यादित नसून, तो संपूर्ण मानवी जीवनाशी जोडलेला आहे. या अभंगांच्या माध्यमातून संत तुकाराम महाराजांनी भक्ती, तत्त्वज्ञान, सामाजिक समता आणि मानवी मूल्ये यांचा सुंदर समन्वय घडवून आणला आहे. त्यामुळे या अभंगांचा अभ्यास करताना आपण केवळ धार्मिक अर्थ न पाहता त्यातील व्यापक जीवनदर्शन समजून घेणे आवश्यक आहे. हे अभंग माणसाला अंतर्मुख होण्याची प्रेरणा देतात आणि जीवनातील खर्या आनंदाचा मार्ग दाखवतात. तुकाराम महाराजांच्या या अभंगांमध्ये एक अत्यंत महत्त्वाचा विचार दिसून येतो; तो म्हणजे देव हा बाह्य वैभवाचा नव्हे; तर अंतःकरणातील भावनेचा भुकेला आहे.

समाजात अनेकदा धर्माचे स्वरूप कर्मकांड, बाह्य प्रदर्शन आणि प्रतिष्ठा यांच्याशी जोडले जाते. मंदिरांची भव्यता, धार्मिक विधींचा मोठेपणा किंवा संपत्तीचे प्रदर्शन यालाच भक्ती समजले जाते; परंतु संत तुकाराम महाराज या सर्व बाह्य गोष्टींपलीकडे जाऊन माणसाच्या अंतर्मनातील निर्मळ भावनांना महत्त्व देतात. अंतरींची घेतो गोडी या ओळीत त्यांनी अत्यंत सहजपणे सांगितले, की देवाला माणसाच्या मनातील प्रेम, करुणा आणि प्रामाणिकता अधिक प्रिय आहे. त्यामुळे त्यांच्या अभंगांमध्ये भक्ती ही केवळ पूजा-अर्चा नसून; ती मनाची शुद्धता आणि जीवनातील सद्गुणांची अभिव्यक्ती आहे.



आध्यात्मिक ठेवा


त्यांच्या अभंगवाणीत भक्तीचा जो निर्मळ आणि सहज प्रवाह आढळतो; तो महाराष्ट्राच्या संतपरंपरेतील सर्वांत मोठा आध्यात्मिक ठेवा मानला जातो. त्यांच्या अभंगांमध्ये केवळ देवभक्ती नसून; मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान, सामाजिक समता, प्रेम, करुणा आणि अंतर्मनातील सत्य यांचे गूढ दर्शन घडते. या अभंगातून संत तुकाराम महाराजांनी भक्तीचे अत्यंत सूक्ष्म आणि जीवनाला दिशा देणारे तत्त्वज्ञान मांडले आहे. या अभंगांमध्ये देव हा दूरस्थ, भयप्रद किंवा केवळ कर्मकांडातून प्राप्त होणारा नाही; तर तो अंतःकरणातील प्रेम, निर्मळता आणि भावनेतून अनुभवता येणारा आहे. अंतरींची घेतो गोडी । पाहे जोडी भावाची या ओळीत संत तुकाराम महाराज भक्तीचा मूलभूत सिद्धांत सांगतात. देवाला बाह्य आडंबर, मोठेपणा किंवा संपत्ती महत्त्वाची वाटत नाही; तो भक्ताच्या अंतःकरणातील भाव पाहतो. अंतरींची गोडी म्हणजे मनातील शुद्ध भावना, प्रेम, करुणा आणि निःस्वार्थ भक्ती होय. समाजात अनेकदा धर्माचा अर्थ बाह्य प्रदर्शनाशी जोडला जातो. मोठमोठे विधी, दानधर्म, मंदिरातील अलंकार किंवा धार्मिक प्रतिष्ठा यांना महत्त्व दिले जाते; पण तुकाराम महाराज सांगतात, की देवाला या गोष्टींपेक्षा अंतर्मनातील प्रामाणिकता अधिक प्रिय आहे. तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने पाहिले, तर ही ओळ भक्तियोगाचा अत्यंत गहन अर्थ स्पष्ट करते. भगवद्गीतेमध्ये श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात, की पत्रं पुष्पं फलं तोयं म्हणजे अगदी एक पान, फूल, फळ किंवा पाणी जरी भक्तिभावाने अर्पण केले; तरी ते स्वीकारले जाते. याच विचाराचा विस्तार संत तुकाराम महाराज करतात. देव हा भावाचा भुकेला आहे. उदाहरणार्थ, शबरीने रामाला अर्पण केलेली बोरे ही राजवैभवाने सजवलेली नव्हती; पण तिच्या प्रेमामुळे ती प्रभूंना प्रिय झाली. विदुराच्या घरी कृष्णाने खाल्लेली साधी भाजी ही राजदरबारातील भोजनापेक्षा अधिक महत्त्वाची ठरली. कारण त्यामागे प्रेम आणि

# मेंदू सक्रिय ठेवण्यासाठी



दररोज कोडी (सुडोकू किंवा बुद्धिबळ) सोडवणे, शारीरिक व्यायाम, भरपूर पाणी पिणे आणि ७-८ तासांची गाढ झोप घेणे आवश्यक आहे यामुळे स्मरणशक्ती वाढते आणि निर्णयक्षमता सुधारतेमेंदूची कार्यक्षमता वाढवण्यासाठी आणि तो नेहमी तल्लख ठेवण्यासाठी काही सोप्या आणि प्रभावी टिप्स खालीलप्रमाणे आहेत:नवीन कौशल्ये शिका: नवीन भाषा शिकणे, वाद्य वाजवणे किंवा चित्रकला यांसारख्या गोष्टींमुळे मेंदूला नवीन आव्हान मिळते आणि त्याची कार्यक्षमता वाढतेमानसिक व्यायाम (ईरळप एुशीलळीशी): सुडोकू, क्रॉसवर्ड कोडी किंवा चेस (बुद्धिबळ) यांसारखे खेळ रोज १५-२० मिनिटे खेळल्याने मेंदू तीक्ष्ण होतोनियमित शारीरिक व्यायाम: रोज २० ते ३० मिनिटे व्यायाम केल्याने मेंदूमध्ये ऑक्सिजनचा प्रवाह सुधारतोसकस आहार: अक्रोड, बदाम, हिरव्या पालेभाज्या आणि ओमेगा-३ युक्त आहार पुरेशी झोप: रात्री ७-८ तासांची शांत आणि गाढ झोप घेतल्याने मेंदूच्या पेशींची दुरुस्ती होते आणि नवीन गोष्टी शिकण्याची क्षमता वाढते वाचन करण्याची सवय: नववीन पुस्तकांचे वाचन केल्याने कल्पनाशक्तीला चालना मिळतेभरपूर पाणी प्या.

# किती दिवसांपर्यंत खाऊ शकता



मुंबई : उन्हाळा येताच बाजारात कलिंगड(रींशीश्राशश्रेप) दिसण्यास सुरूवात होते. कलिंगडाची वाट सगळेच पाहत असतात. उन्हाळ्यामध्ये रसदार कलिंगड खायला सार्यांनाच आवडते. कलिंगड हे असे फळ आहे जे प्रत्येकाला आवडते. यातील अनेक पोषकतत्वे आपल्या शरीराचे आरोग्य चांगले राखण्यास मदत होते.जाणून घ्या याचे फायदे- कलिंगडामध्ये ९० टक्के पाणी असते त्यामुळे शरीरातील पाण्याची कमतरता भरून निघण्यास मदत होते. कलिंगडामध्ये कॅलरीज कमी प्रमाणात असतात यामुळे वजन कमी करण्यास कलिंगड महत्त्वाची भूमिका निभावते. यामुळे कलिंगडामध्ये ब्लड प्रेशर, हाडे, दातांचा त्रास, डोळ्यांचा त्रास, पेशींचे पुनर्निमाण तसेच कॅन्सरसारख्या आजारांविरोधात लढण्याचे गुण आहेत. यातील पोषकतत्वे शरीराला सुधारण्यास मदत करतात.कापलेले कलिंगड चांगले की नाही?कलिंगड हे खाण्यासाठी चविष्ट लागतेच मात्र त्याचे आरोग्यासही अनेक फायदे आहेत. मात्र अनेकदा लोक कापलेले कलिंगड अर्धे कापून ठेवतात आणि काही दिवसांनी खातात. तुम्हाला माहीत आहे का कापलेले टरबूज खाणे किती दिवसांपर्यंत योग्य असते? कलिंगडामध्ये पाण्याचे प्रमाण मोठे असते त्यामुळे तारीख सांगणे थोडे कठीण असते मात्र कलिंगड कापल्यास ते लगेचच खाल्ले पाहिजे. जर एकावेळेस कलिंगड खाल्ले नाही तर याला थंड जागेवर ठेवावे. यामुळे ते चांगले राहते. मात्र यानंतर त्याचा स्वाद आणि गुणवत्ता राहत नाही.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



रात्रीतून तुमचा श्वासोच्छवास नीट होत असूनही गळ्याच्या बाजूला श्वसनमार्गात तात्पुरते अडथळे येतात. जर तुमचे वजन वाढलेले असेल किंवा टॉन्सिल, जबडा आणि पडजीभ यांची संरचना वेगळी असते, अशावेळी ऑक्सिजन लेव्हल कमी होते. रात्रीतून तुमचा श्वासोच्छवास नीट होत असूनही गळ्याच्या बाजूला श्वसनमार्गात तात्पुरते अडथळे येतात. जर तुमचे वजन वाढलेले असेल किंवा टॉन्सिल, जबडा आणि पडजीभ यांची संरचना वेगळी असते, अशावेळी ऑक्सिजन लेव्हल कमी होते. थोड्या

## २ Joke विनोद




शिक्षक विद्यार्थ्यांना विचारतात, मला सांग, आई श्रेष्ठ की शिक्षक?

शिक्षक !

कारण आई एका वेळेस एकाच मुलाला झोपवते तर शिक्षक नीरस शिकवताना सर्व वर्गाला झोपवतात.

## ३ Message संदेश



ILU Means, What Does ILU Means..? I= I
L= Love
U= Urdu
so I Love Urdu..
Tum Kiya Samjhey Thy,
“I Love Ullu ?”
to Haan Me Tum se Bhi
Piyar Karti Hoon..

## ४ Thought सुविचार




दूरस्थ साधु-संत हिमनगांसारखे लांबूनही दिशा उजळतात; जवळचे दुर्जन मात्र रात्री फेकलेल्या बाणांसारखे न दिसूनही हानी करतात.
- अज्ञात

**संस्कृत सुभाषित**

शैले शैले न माणिक्यं, मौक्तिकं न गजे गजे ।साधवो हि न सर्वत्र चंदनं न वने वने ।।

अर्थ - प्रत्येक पर्वतावर माणिक सापडत नाहीत, प्रत्येक हत्तीच्या ठायी (गंडस्थळात) मोती सापडत नाहीत, सर्वच ठिकाणी सभ्य लोक (साधु-संत) आढळत नाहीत आणि प्रत्येक वनात चंदन सापडत नाही.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. पत्रातून गायब झालेला मायना
९. मत्सर
११. ढग
१२. रुक्मिणीशी बलरामाचे नाते
१३. उत्तराधिकारी
१४. गायनातील एक ताल
१६. मासला
१८. नशीब लिहिणारी देवता
२०. डाव असा खेळू नये
२१. कठीण (प्रसंग)
२२. नाजूकपणे, हळुवार
२३. वैताग, त्रास
२५. समुद्रदेवता
२७. भीमाजवळचे शस्त्र
२८. फुलपुडीत येणारी बिनवासाची फुले
२९. लहान मुलांमधील अस्थमा
३१. उन्माद, गर्व
३२. एकशे पंचवीस
३३. त्रिकूट
३४. जीवमात्र
३५. चटकन
३७. धाक, दरारा
४०. गरज
४१. नारळाचे कवच
४३. दरोडा
४५. दिशाहीन पळणे
४९. राजवाडा
५०. बिरड्या
५१. चंद्र
५४. रुचीहीन
५५. वाळवी
५७. वाटाणा
५८. एक चर्मरोग
५९. मंत्रीमंडळ
६१. सीमेवरील चौकी
६२. विशेष
६३. डावा
६४. सुरुवातीलाच नकारघंटा!
६६. चातकासह सगळ्यांनाच वाट पाहायला लावणारा ऋतू
६७. सम्राट
६९. कशा प्रकारचा
७१. पौराणिक अश्वाहन
७२. भारताचे राष्ट्रीय फूल
७४. घरोघर
७५. खोडकर, खट्याळ (हिंदी)
७७. कबूतर
७८. दरवाजा
८०. महान, मोठा
८१. नम्रता
८२. संथ गतीने

### उभे शब्द

१. खटल्याचा आधार
२. अनेक विनोदी अभिनेत्यांना उजेडात आणणारा दूरदर्शनवरील कार्यक्रम
३. -- दमयंती
४. मदनाचे एक आयुध
५. आरास, मांडणी
६. बाईलबुद्ध्या
७. बाण, नदीचा काठ
८. अखेर, समाप्त
९. गुप्त हस्तक
१०. दुर्गंधी येऊ लागलेला
१३. खराब, हीन
१५. लपणे, -- मारणे
१७. खरे तर कर्णबधिर
१८. अखेरीस
१९. वेडावाकडा
२२. नखरा, लकब
२४. नखावरील ठिपका, घट्ट दही
२५. नाट्यगीतातील मबोलफ
२६. जुन्या काळी डोक्याला बांधले जाणारे वस्त्र
२७. नामघोष
२९. टणक खोडाचे काटेरी झाड
३०. खोड, सवय, चटक
३१. मर्कट
३२. युद्ध
३६. सिंह
३८. टप्प्याटप्प्याने केलेला प्रवास
३९. चांदणी
४२. नमनीय
४४. दिवसभराचे एकूण कार्य
४५. सैल असलेले, ढगाळ
४६. भांडण, शत्रुत्व
४७. हिंदीत सुवर्ण किंवा झोपणे
४८. अफूचे बीज
५०. लाकूड छिलण्याचे हत्यार
५२. पाणी
५३. दमणे
५६. वर्तमानपत्रातील कप्पा
६०. पदार्थ शिजतानाचा आवाज
६१. ठाण्याच्या रहिवासी
६२. संसद सदस्य
६३. वाहणारी हवा
६५. लत्ता, पायाने मारणे
६६. वाटी, पात्र
६७. मादक स्त्री
६८. पराभव
६९. सुवर्ण, हाटक
७०. आंब्याची पोळी
७३. स्त्रियांची छेड काढणारा
७६. चांगला मावा
७७. गावगप्पांची जागा
७८. देणारा
७९. गद्दारी

### आडवे उत्तरे

१.साष्टांग नमस्कार विनंती विशेष ९.हेवा ११.जलद १२.दीर १३.वारस १४.दादरा १६.नमुना १८.सटवाई २०.रडी २१.बाका २२.अलवार २३.कटकट २५.वरूण २७.गदा २८.तेरडा २९.बाळदमा ३१.माज ३२.सवाशे ३३.तिकडी ३४.भेद ३५.लवकर ३७.वचक ३८.भूत ४०.नड ४१.करवंटी ४३.डाका ४५.सैरावैरा ४९.महाल ५०.वाल ५१.रजनीनाथ ५४.नीरस ५५.कसर ५७.कलाय ५८.खरूज ५९.सरकार ६१.ठाणे ६२.खास ६३.वाम ६४.नाट लावणे ६६.पाऊस ६७.महाराज ६९.कसा ७१.रत ७२.कमळ ७४.दारोदार ७५.नटखट ७७.पारवा ७८.दार ८०.थोर ८१.लीनता ८२.सावकाश

### उभे उत्तरे

१.साक्षीदार २.गजरा ३.नल ४.मदनबाण ५.रचना ६.नंदीबैल ७.तीर ९.हेर १०.वासकट १३.वाईट १५.दडी १७.मुका १८.सरतेशेवटी १९.वाकडातिकडा २२.अदा २४.कवडी २५.वद २६.रूमाल २७.गरज २९.बाभूळ ३०.रद ३१.माकड ३२.समर ३६.वनराज ३८.मजलदरमजल ३९.तारा ४२.वंदनीय ४४.कामकाज ४५.सैलदर ४६.वैर ४७.सोना ४८.खसखस ५०.वाकस ५२.नीर ५३.थकणे ५६.रकाना ६०.रटरट ६१.ठाणेकर ६२.खासदार ६३.पारा ६५.लाथ ६६.पाळ ६७.मदालसा ६८.हार ६९.कनक ७०.साट ७३.मवाली ७६.खवा ७७.पार ७८.दाता ७९.धोका



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### ऋषभ पंतची हकालपट्टी होणार?

मुंबई–भारताचा स्टार यष्टीरक्षक फलंदाज ऋषभ पंत हा आयपीएल स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात महागडा खेळाडू आहे. लखनौने त्याला २७ कोटींची बोली लावून आपल्या संघात स्थान दिले होते. त्यानंतर त्याच्याकडे कर्णधारपदाची जबाबदारी देखील सोपवण्यात आली होती. पण त्याच्या नेतृत्वाखाली लखनौला हवी तशी कामगिरी करता आलेली नाही. गेल्यावेळी देखील लखनौचा संघ प्लेऑफमध्ये प्रवेश करु शकला नव्हता. यावेळी देखील हा संघ गुणतालिकेत सर्वात शेवटी राहिला आहे. त्यामुळे ऋषभ पंतला कर्णधारपदावरुन काढून टाकण्याची मागणी जोर धरु लागली आहे. दरम्यान लखनौ सुपर जायंट्स संघाचे क्रिकेट डायरेक्टर टॉम मूडी यांनी ऋषभ पंतच्या कर्णधारपदाबाबत मोठं वक्तव्य केले आहे.लखनौ सुपर जायंट्सचे या हंगामातील १४ सामने पूर्ण झाले आहेत. गुणतालिकेत हा संघ सर्वात शेवटी राहिला आहे. दरम्यान या सामन्यानंतर पत्रकार परिषदेत टॉम मूडी म्हणाले की, मफ्मला असे वाटते, अशा बऱ्याच गोष्टी आहेत ज्यावर तुम्ही बोटू ठेवू शकता. माझ्या मते, स्पर्धेतील सुरुवातीच्या टप्प्यात आम्ही खूप चांगली गोलंदाजी केली.

### सरपंचांनी शतकी तडाखा देत पंजाबला सुद्धा तारले,

मुंबई–श्रेयस अय्यरने लखनौ सुपर जायंट्स विरुद्धच्या इंडियन प्रीमियर लीग २०२६ च्या महत्त्वपूर्ण सामन्यात बॅटने शानदार कामगिरी केली. पंजाब किंग्सचा सरपंच कॅप्टन श्रेयसने लखनौ येथील एकाना क्रिकेट स्टेडियमवर झालेल्या सामन्यात अवघ्या ५१ चेंडूंमध्ये नाबाद १०१ धावांची खेळी केली. हे त्याच्या आयपीएल कारकिर्दीतील पहिले शतक होते, पण कदाचित सर्वात खासही. त्याने ११ चौकार आणि पाच षटकारांच्या जोरावर पंजाबला १९७ धावांचे लक्ष्य अवघ्या १८ षटकांत पूर्ण करण्यास मदत केली.करा किंवा मराफ अशा सामन्यात श्रेयस तळपला. सलग सहा पराभवांनंतर, प्लेऑफच्या शर्यतीतून जवळपास बाहेर पडलेल्या पंजाब किंग्सला त्यांच्या कर्णधाराने बॅटने नवसंजीवनी दिली. मकरा किंवा मराफ अशा सामन्यात, पंजाब किंग्सची सुरुवातीला अवस्था बिकट होती. त्यांनी अवघ्या २२ धावांत दोन विकेट गमावल्या होत्या आणि आणखी एका पराभवाचे सावट होते. पण श्रेयस अय्यरने एक दमदार खेळी खेळून संघाला विजय मिळवून दिला. पंजाब किंग्सला शेवटच्या पाच षटकांत ४७ धावांची गरज होती आणि सलग पराभवांचा दबाव स्पष्टपणे जाणवत होता. मग मोहम्मद शमी गोलंदाजीला आला आणि श्रेयस अय्यरने सामना जागेवरच संपवला.

### हिटमॅनकडून हे अनअपेक्षित! शर्माच्या नावे नकोसा रेकॉर्ड

मुंबई–आयपीएल २०२६ स्पर्धेतील ६९ वा सामना मुंबई इंडियन्स आणि राजस्थान रॉयल्स या दोन्ही संघांमध्ये सुरु आहे. वानखेडे स्टेडियमवर सुरु असलेल्या या सामन्यात मुंबईने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या राजस्थान रॉयल्सने २० षटकांअखेर ८ गडी बाद २०५ धावा केल्या. मोठ्या आव्हानाचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या मुंबई इंडियन्सला चांगल्या सुरुवातीची गरज होती. पण सलामीला आलेला रोहित शर्मा शून्यावर माघारी परतला आहे. यासह रोहितच्या नावे नकोसा रेकॉर्ड नोंदवला गेला आहे. मुंबईने पहिल्या डावात दमदार सुरुवात केली होती. राजस्थानचा संघ २०० धावांचा पल्ला गाठणार, असं वाटत नव्हतं. पण शेवटी राजस्थानच्या गोलंदाजांनी मोलाचं योगदान दिलं आणि संघाची धावसंख्या २०० पार पोहोचवली. २०६ धावांचा पाठलाग करताना मुंबई इंडियन्सला दमदार सुरुवातीची गरज होती. मुंबईकडून रोहित शर्मा आणि रायन रिकल्टनची जोडी मैदानावर सुरुवात करुन दिली होती.

# दिल्लीचा शेवट गोड! कोलकाता नाईट रायडर्सला घरच्या मैदानावर नमवलं



**नवी दिल्ली:** कोलकाता नाईट रायडर्स आणि दिल्ली कॅपिटल्स या दोन्ही संघांमध्ये झालेल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने दमदार विजयाची नोंद केली आहे. आयपीएल २०२६ स्पर्धेतील साखळी फेरीतील शेवटचा सामना कोलकाता नाईट रायडर्स आणि दिल्ली कॅपिटल्स या दोन्ही संघांमध्ये पार पडला. दोन्ही संघ प्लेऑफच्या शर्यतीतून बाहेर पडले होते, त्यामुळे या सामन्याच्या निकालाचा गुणतालिकेवर फरक पडणार नव्हता. पण तरीदेखील दोन्ही संघांनी विजय मिळवण्यासाठी पूर्ण जोर लावला. इडन गार्डन्सच्या मैदानावर पार पडलेल्या या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सने प्रथम फलंदाजी करताना २०३ धावा केल्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या कोलकाता नाईट रायडर्स संघाला १६३ धावांपर्यंत मजल मारता आली. यासह दिल्लीने हा सामना ४० धावांनी खिशात घातला.

कोलकाता नाईट रायडर्सला हा सामना जिंकण्यासाठी २०४ धावा करायच्या होत्या. या मोठ्या आव्हानाचा पाठलाग करताना कोलकाताला जशी सुरुवात हवी होती, तशी सुरुवात कर्णधार अजिंक्य रहाणेने करून दिली. त्याने ३९ चेंडूत ४ चौकार आणि ४ षटकारांचा साहाय्याने ६३ धावांची खेळी केली. तर फिन ॲलेनने २० धावा केल्या. मनीष पांडे २५ धावा करून माघारी परतला. कॅमेरुन ग्रीन अवघ्या २ धावा करून माघारी परतला. रिंकू सिंग गोल्डन डकवर माघारी परतला. कोलकाताचा डाव १६३ धावांवर आटोपला.

या सामन्यात कोलकाता नाईट रायडर्सने नाणेफेक जिंकून दिल्लीला प्रथम फलंदाजी करण्याचं आमंत्रण दिलं होतं. दिल्लीकडून अभिषेक पोरेल आणि केएल राहुलची जोडी डावाची सुरवात करण्यासाठी मैदानात आली. या जोडीने दमदार सुरुवात करून दिली. अभिषेकने २२ धावा केल्या. तर केएल राहुलने ६० धावा केल्या. त्यानंतर फलंदाजीला आलेल्या साहिल पारेखने २४ धावा केल्या. तर कर्णधार अक्षर पटेलने ३९ धावा चोपल्या. शेवटी डेव्हिड मिलरने २८ धावा केल्या. तर आशुतोष शर्माने नाबाद १८ धावा केल्या. यासह दिल्ली कॅपिटल्सने २० षटकांअखेर ५ गडी बाद २०३ धावा केल्या.

### जिंकूनही कोलकाताला प्लेऑफपासून वंचित

कोलकाता नाईट रायडर्सचा संघ प्लेऑफच्या शर्यतीत होता. पण मुंबई इंडियन्सच्या पराभवामुळे कोलकाता नाईट रायडर्सची प्लेऑफची संधी हुकली. जर मुंबईने हा सामना जिंकला असता, तर कोलकाता नाईट रायडर्स संघासमोर धावांचं समीकरण होतं, पण असं काहीच झालं नाही. त्यामुळे हा सामना जिंकूनही कोलकाताला प्लेऑफपासून वंचित राहावं लागलं असतं. शेवटी दिल्लीने विजयाने हंगामाचा शेवट केला आहे.

## चिअरलिडर्ससोबत घडला दुर्व्यवहार

मुंबई–आयपीएल २०२६ मध्ये लखनऊ सुपर जायंट्स आणि पंजाब किंग्स यांच्यातील महत्त्वाच्या सामन्यादरम्यान एक अत्यंत धक्कादायक घटना घडल्याचे वृत्त समोर आले आहे. स्टेडियममध्ये उपस्थित असलेल्या काही प्रेक्षकांनी थेट चिअरलिडर्ससोबत दुर्व्यवहार केल्याचा आरोप होत आहे. हा सामना दोन्ही संघांसाठी प्लेऑफच्या शर्यतीत टिकून राहण्यासाठी महत्त्वाचा होता. त्यामुळे चाहत्यांमध्येही मोठा उत्साह दिसून येत होता. अशातच काही अतिउत्साही प्रेक्षकांकडून हा दुर्व्यवहार करण्यात आला. महिला पोलिस कर्मचाऱ्यांनी संबंधित चाहत्यांना कडक शब्दांत सुनावले आणि परिस्थिती नियंत्रणात आणली.

# राम चरणने मध्यरात्री बुमराहची मागितली माफी





मुंबई–दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील स्टार फलंदाज राम चरण हा मपेद्दीफ चित्रपटाच्या म्युजिक लाँच इव्हेन्टमध्ये आला होता. यावेळी त्याने जसप्रीत बुमराहला फुटबॉलर म्हणून उद्देशले. भारताचा स्टार गोलंदाज जसप्रीत बुमराहला फुटबॉलर म्हटल्यामुळे क्रिकेट फॅन्सना धक्का बसला. एवढंच नाही तर त्याने भोपालच्या लोकांना बिहारचे लोकं म्हणून सांगितलं. राम चरणकडून कार्यक्रमात झालेल्या या दोन ब्लंडरचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. व्हिडीओ व्हायरल झाल्यावर यूजर्सनी अभिनेत्याला ट्रोल केलं. फॅन्स हैराण झाले की रॅम चरणला नेमकं झालंय तरी काय? त्यानंतर जेव्हा अभिनेत्याला आपल्या चुकीबाबत समजलं तेव्हा त्याने मध्यरात्री जसप्रीत बुमराहने त्याची माफी मागितली.

जसप्रीत बुमराहला म्हणाला फुटबॉलर : राम चरण त्याचा आगामी सिनेमा मपेद्दीफच्या म्युझिक लाँच इव्हेन्टसाठी आला होता. यात राम चरण ऐवजी जान्हवी कपूर, एआर रहमान आणि चित्रपटातील इतर कलाकार उपस्थित होते. या कार्यक्रमादरम्यान राम चरणने म्हटले की, तो देशातील काही मोठ्या क्रिकेट स्टारला त्याने दोन शब्दात डिस्क्राइब करावं. मात्र या रॅपिड फायर राऊंड दरम्यान राम चरण दोन उत्तर देताना घडबडला आणि त्याचं उत्तर ऐकून सर्वच हैराण झाले.

राम चरण सचिन तेंडुलकर, विराट कोहली आणि महेंद्रसिंग धोनी यांच्याबद्दल आपल्या खास शैलीत बोलला, पण जेव्हा जसप्रीत बुमराहबद्दल विचारण्यात आलं, तेव्हा तो स्वत: एक क्रिकेटपटू आहे हेच विसरला. राम चरणने जसप्रीत बुमराहला चुकून फुटबॉलर म्हणून संबोधले. राम चरण म्हणाला की, मजसप्रित बुमराह जी मी तुमचा सर्वात मोठा फॅन आहे. मला फुटबॉल आवडतो आणि तुम्ही फुटबॉलला एवढं पुढे नेत आहात. लव्ह यू सरफ. राम चरणचा हा व्हिडीओ व्हायरल झाल्यावर फॅन्सने त्याखाली कमेंट्सचा पाऊस पाडला. अनेक यूजर्सनी अभिनेत्याची खिल्ली उडवली.

**मध्यरात्री मागितली माफी :** राम चरणला त्याची चूक समजल्यावर त्याने २४ मे रोजी मध्यरात्री सोशल मीडियावर जसप्रीत बुमराहची माफी मागितली. सोबतच म्हटलं की मी खरंच त्याचा खूप आदर करतो आणि त्याचा फॅन सुद्धा आहे, पण त्याच्याकडून नकळत चूक घडली. राम चरणने रात्री १२:५५ वाजता ट्विट केलं आणि हात जोडून म्हटलं की, ओह्ह... मी कधीकधी नावे विसरण्याच्या बाबतीत खूपच निष्काळजी करतो. जसप्रीत बुमराह मी खरोखरच या चुकीसाठी तुमची माफी मागू इच्छितो. भीड आणि उत्साहात ही नकळत झालेली चूक आहे. मी तुमचा खूप सन्मान करतो.

# फिट इंडिया संडेज ऑन सायकलच्या ७५ व्या आवृत्तीनिमित्त विविध उपक्रम

## भारताच्या भव्य राष्ट्रकुल दिन सोहळ्याचे अहमदाबादने केले नेतृत्व

दिल्ली–फिट इंडिया सायकल ऑन संडेज ७५व्या आवृत्तीनिमित्त देशभरात ८,०००हून अधिक ठिकाणी आयोजित उपक्रमामध्ये मोठ्या प्रमाणात लोक सहभाग दिसून आला. या उपक्रमाद्वारे, राष्ट्रकुल क्रीडा दिन साजरा करण्यात आला तसेच अहमदाबाद इथे २०२९–३० मध्ये होणाऱ्या ऐतिहासिक राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या तयारीला एक नवी गती मिळाली.

अहमदाबादच्या लोकप्रिय साबरमती नदीकिनाऱ्यावरून राष्ट्रीय सोहळ्याचे नेतृत्व करताना केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा आणि श्रम आणि रोजगार मंत्री डॉ. मनसुख मांडवीय, गुजरातचे उपमुख्यमंत्री हर्ष संघवी आणि सिनेअभिनेता आयुषमान खुराना हे इतर ५००० सायकलस्वार, धावपटू, आणि युवा स्वयंसेवक आणि फिटनेस प्रेमींसह सहभागी झाले. यावेळी सामुदायिक सहभाग आणि क्रीडा भावनेचे उत्साही दर्शन घडले.

अहमदाबादमधील अ न्यू आयकॉन फॉर फिटर इंडिया– पेडलिंग टू २०३० (निरोगी भारतासाठी एक नवे प्रतीक – सायकलवारी २०३०च्या दिशेने ) या विषयसूत्रासह आयोजित करण्यात आलेल्या आवृत्तीमध्ये पाच किलोमीटर सायकल फेरीसह योग आणि झुम्बाची प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. त्यामुळे साबरमती नदीकिनाऱ्यावर तंदुरूस्ती, संस्कृती आणि देशाच्या क्रीडा विकासाचा उत्सव साजरा झाला.

भारताची क्रीडा क्षेत्रातील कामगिरी, खेलो इंडिया उपक्रमांतर्गत विकसित झालेल्या क्रीडा पायाभूत सुविधा आणि २०३० मध्ये होणाऱ्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांचे शताब्दी वर्ष या साऱ्या पार्श्वभूमीवर देशातील विस्तारित क्रीडा परिसंस्थेचे दर्शन घडवणाऱ्या विशेष प्रदर्शनाचे उद्घाटन डॉ. मांडवीय यांच्या हस्ते झाले, हे कायक्रमाचे प्रमुख वैशिष्ट्य ठरले.

अभिनेता आयुषमान खुरानाने राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील माजी पदक विजते आणि ऑलिम्पिक मधील खेळाडू गुरजीत कौर, रजनी एटीमारपू, सोनिका तांडी, अंजुम मौडगिल, अंकुर मित्तल आणि तृप्ती मुरगुंडे यांच्यासह कार्यक्रमात सहभाग घेतला. युवा सहभागींना प्रोत्साहन दिले आणि भारतातील युवकांमध्ये रुजणाऱ्या तंदुरुस्ती आणि क्रीडा संस्कृतीला प्रेरणा देत बळ दिले.

या कार्यक्रमाला भारतीय ऑलिम्पिक संघटनेचे वरिष्ठ उपाध्यक्ष अजय पटेल, ऑलिम्पिक नेमबाज आणि राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील पदकविजेता गगन नारंग, खेलो इंडियाचे उपमहासंचालक मयंक श्रीवास्तव, व 'ॲथलेटिक्स फडरेशन ऑफ इंडिया'चे अध्यक्ष आदिल सुमारीवाला यांच्यासह अनेक प्रतिष्ठित मान्यवर आणि क्रीडा क्षेत्रातील दिग्गजांची उपस्थिती लाभली.

या कार्यक्रमाचे एक विशेष सांस्कृतिक आकर्षण म्हणजे प्रख्यात कलाकार अनिश रंगरेज यांनी सादर केलेला गरब्याच्या पारंपरिक उत्साहाचा आणि योगशास्त्राचा संगम असलेला अनोखा कार्यक्रम.

याशिवाय, मोरारजी देसाई राष्ट्रीय योग संस्थेचे डॉ. पवन कुमार यांनी सहभागींसोबत आरोग्यविषयक सल्लामसलत आणि मार्गदर्शन सत्रांद्वारे संवाद साधत सर्वांगीण तंदुरुस्ती आणि निरोगी जीवनशैलीचा प्रचार केला.

२०३० मध्ये होणाऱ्या ऐतिहासिक राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांच्या शताब्दी वर्षाच्या व्यापक पूर्वतयारीचा एक भाग म्हणून, युवक व्यवहार आणि क्रीडा मंत्रालय देशभरात भव्य, संवादात्मक आणि समुदाय–केंद्रित उपक्रमांचे आयोजन पुढेही करत राहणार आहे. या माध्यमातून जनसहभाग अधिक वाढेल आणि भारताची क्रीडा परिसंस्था अधिक मजबूत होईल. देशव्यापी उत्सवांद्वारे राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा चळवळीबाबत अधिक जनजागृती निर्माण करण्याचे तसेच २०३० मध्ये भारत राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांचे यजमानपद स्वीकारण्याच्या तयारीत असताना युवकांना तंदुरुस्ती, क्रीडा आणि सक्रिय जीवनशैली अंगीकारण्यासाठी प्रेरित करण्याचे उद्दिष्ट आहे.

केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा तसेच कामगार व रोजगार मंत्री डॉ. मांडविया म्हणाले, ''आजचा दिवस अत्यंत विशेष आहे, कारण आपण 'फिट इंडिया संडेज ऑन सायकल'च्या ७५व्या आवृत्तीबरोबरच राष्ट्रकुल क्रीडा दिनही साजरा करत आहोत. २०३० मध्ये गुजरात राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांचे आयोजन करणार असल्याचा मला अभिमान वाटतो आणि पहाटेपासून हजारो लोक तंदुरुस्ती आणि राष्ट्रनिर्मितीसाठी एकत्र आल्याचे पाहून अधिक आनंद होत आहे.

सुदृढ समाजच समृद्ध राष्ट्र घडवू शकतो. सायकल चालवल्यामुळे आपण तंदुरुस्त राहतो, प्रदूषण कमी होते आणि इंधन बचतही होते. तसेच, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इंधन वापर कमी करण्यासाठी केलेल्या आवाहनाशीही हे सुसंगत आहे. अगदी कमी अंतरासाठीसुद्धा दैनंदिन जीवनात सायकलचा वापर स्वीकारल्यास आपण अधिक निरोगी आणि शाश्वत भारत घडविण्यात योगदान देऊ शकतो.''

गुजरातचे उपमुख्यमंत्री हर्ष संघवी म्हणाले, ''आज अहमदाबाद शहर 'फिट इंडिया संडेज ऑन सायकल'मुळे उत्साहाने उजळून निघाले होते आणि गुजरातमधील जनतेकडून मिळालेला प्रचंड प्रतिसाद पाहून मला अत्यंत आनंद झाला. हजारो नागरिकांनी पहाटेपासून तंदुरुस्ती आणि खेळांसाठी बाहेर पडणे हे निरोगी जीवनशैलीबाबत वाढती जागरूकता आणि उत्साह दर्शवते.''

अहमदाबादमध्ये दिसून आलेला लोकांचा मोठा सहभाग हा संपूर्ण गुजरातमध्ये क्रीडा आणि तंदुरुस्तीसाठी वाढत असलेल्या उत्साहाचे प्रतीक होता, त्याचप्रमाणे याद्वारे भविष्यात मोठ्या आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यासाठी राज्य सज्ज असल्याचेही अधोरेखित झाले.

यावेळी सामान्य नागरिक, खेळाडू, तरुण स्वयंसेवक आणि फिटनेसप्रेमी मोठ्या संख्येने सहभागी झाले. त्याद्वारे या प्रदेशातील क्रीडा संस्कृतीचा जलद विकास दिसून आला आणि २०३० च्या राष्ट्रकुल क्रीडास्पर्धेच्या पार्श्वभूमीवर जागतिक क्रीडा स्पर्धांसाठी अहमदाबाद एक प्रमुख ठिकाण म्हणून उदयास येत असल्याचे सिद्ध झाले.

अभिनेता आणि फिट इंडियाचा आयकॉन, आयुष्मान खुराना म्हणाला, आज येथे सर्व वयोगटातील लोकांना आनंद मिळवताना आणि मोठ्या उत्साहाने सहभागी होताना पाहून मला खरोखरच खूप आनंद होत आहे. फिट इंडिया आणि आगामी २०३० राष्ट्रकुल स्पर्धांमधील सहकार्य खूप चांगले आहे, भारतीय तरुणांमध्ये क्रीडा संस्कृतीला प्रेरणा देणारे आहे. संडेज ऑन सायकल हा एक अतिशय स्तुत्य, मनोरंजक आणि भविष्याचा वेध घेणारा उपक्रम आहे.हा कार्यक्रम संपूर्ण देशभरासह, साई प्रादेशिक केंद्रे, राष्ट्रीय उत्कृष्टता केंद्रे, खेलो इंडिया केंद्रे आणि सार्वजनिक ठिकाणी एकाच वेळी पार पडला, यामध्ये ऑलिंपिकपटू, राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेतील पदक विजेते आणि क्रीडा क्षेत्रातील दिग्गज आपापल्या भागातील नागरिकांसोबत सामील झाले.

केंद्रीय युवक व्यवहार आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा निखिल खडसे यांनी गुवाहाटीमध्ये या कार्यक्रमाचे नेतृत्व केले, माजी कुस्तीपटू बबिता फोगट यांनी धरमशाला येथे भाग घेतला, तर चक दे! इंडिया या प्रसिद्ध चित्रपटामागील प्रेरणांपैकी एक असलेल्या, माजी भारतीय हॉकीपटू सबा अंजुम यांनी मुंबईतील कार्यक्रमात भाग होऊन क्रीडा जन भागीदारी कार्यक्रमाच्या देशव्यापी उत्साहात भर घातली.

अहमदाबाद येथे २०३० मध्ये ऐतिहासिक राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे. त्या दिशेने वाटचाल सुरु असताना संपूर्ण देशाने एकत्र येऊन सायकल चालवण्याचा आजचा सोहळा हा तंदुरुस्त, मजबूत आणि महत्वाकांक्षी क्रीडा भविष्याची आठवण ठरला आहे.



दक्षिण कोरियातील सुवॉन येथे एएफसी महिला चॅम्पियन्स लीगच्या अंतिम सामन्यात स्पर्धा करताना नाएगोह्यांग एफसी आणि टोकियो वर्डी बेलेझा संघाच्या महिला खेळाडू.

# लातूर जिल्ह्यात पाणी टंचाई निवारणार्थ उपाययोजना

### लातूर जिल्ह्यात २ टँकर, ७५ खाजगी विहिरींचे अधिग्रहण

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यात उन्हाळ्याची तीव्रता वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, लातूर यांच्या वतीने पाणी टंचाईवर मात करण्यासाठी विविध उपाययोजना युद्धपातळीवर राबवल्या जात आहेत. ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची कमतरता भासू नये, यासाठी प्रशासनाकडून टँकरद्वारे पाणीपुरवठा आणि खाजगी विहिरींचे अधिग्रहण करण्यात येत आहे.

सद्यस्थितीत जळकोट तालुक्यामध्ये तीव्र पाणी टंचाई जाणवत असल्यामुळे तिथे टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यात आला आहे. जळकोट तालुक्यातील २ गावे आणि १ वाडी अशा एकूण ३ ठिकाणी टँकरद्वारे पाणी पुरवले जात असल्यामुळे सुमारे ३,३१० नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. यासाठी शासनाचे २ टँकर कार्यरत असून त्यांच्या दररोज एकूण ४ फेऱ्या मंजूर करण्यात आल्या आहेत. या सर्व फेऱ्या यशस्वीरित्या पूर्ण केल्या जात आहेत. प्रामुख्याने जळकोट तालुक्यातील शिवाजी नगर तांडा – वाघमारी तांडा आणि गव्हाण येथे टँकर मंजूर करण्यात आले आहेत.

टँकर व्यतिरिक्त जिल्ह्यातील इतर गावांमध्ये पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर खाजगी विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे जिल्ह्यात एकूण ६५ गावे आणि वाड्यांमध्ये ७५ विहिरी किंवा विंधन विहिरी अधिग्रहित करण्यात आल्या आहेत. अहमदपूर तालुक्यात २५ गावे व वाड्यांमध्ये ३० विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे, तर औसा तालुक्यात १७ गावांमध्ये २२ विहिरी, उदगीर तालुक्यात १० गावांमध्ये ११ विहिरी, चाकूर तालुक्यात ४ गावांमध्ये ४ विहिरी, रेणापूर तालुक्यात ३ गावांमध्ये ३ विहिरी, लातूर तालुक्यात १ गावात १ विहीर आणि जळकोट तालुक्यात ५ गावांमध्ये ४ विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले आहे.

जिल्हा प्रशासनाचे पाणी टंचाई निवारण पथक संपूर्ण परिस्थितीवर लक्ष ठेवून असून, नागरिकांच्या मागणीनुसार तात्काळ उपाययोजना राबवण्यास कटिबद्ध असल्याचे ग्रामीण पाणी पुरवठा विभागामार्फत सांगण्यात आले आहे.

# युवक-युवतींनी 'मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम' योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** राज्याच्या नवीन औद्योगिक धोरण–२०१९ अंतर्गत राज्यातील शहरी व ग्रामीण क्षेत्रातील सुशिक्षित युवक–युवतींची वाढती संख्या व उद्योग, व्यवसाय क्षेत्रात उपलब्ध होत असलेल्या स्वयंरोजगाराच्या व रोजगाराच्या नवीन संधी विचारात घेऊन उद्योजकतेला चालना देणारी व सृजनशिलतेला कालानुरुप वाव देणारी सर्वसमावेशक 'मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम' योजना राबविण्यात येत आहे. या योजनेच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर व्यापक प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी सुक्ष्म व लघु उपक्रमांना विशेष चालना दिली जात आहे.

या मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेंतर्गत जिल्हा उद्योग केंद्राकडून बँकेच्या कर्ज मंजुरीनंतर अर्जदाराच्या जात प्रवर्ग आणि उद्योग क्षेत्रानुसार १५ ते ३५ टक्के अनुदान दिले जाते, ज्यामध्ये सेवा उद्योग, उत्पादन उद्योग तसेच कृषी पूरक व्यवसाय, कृषीवर आधारित उद्योग, एकाच नाममुद्रेवर (ब्रँड) आधारित संघटित साखळी विक्री केंद्र, फिरते विक्री केंद्र, खाद्यान्न केंद्र, कुक्कुट पालन, अंडी उबवणी केंद्र, मधुमक्षिका पालन, मत्स्यपालन, रेशीम उद्योग, शाकाहारी व मांसाहारी पदार्थ विक्रीचे हॉटेल किंवा ढाबा व्यवसाय, होम स्टे, क्लाऊड किचन, जलक्रिडा, मासेमारी आणि प्रवासी वाहतुकीकरिता बोट व्यवसाय यांचा प्रामुख्याने समावेश करण्यात आला आहे.

या योजनेमधून फिरते फळे व भाजीपाला विक्री करणारे तसेच फिरते हॉटेल व्यवसाय करणारे वाहनासाठी सुद्धा लाभ घेता येत असल्याने, लातूर जिल्ह्यातील इच्छुकांनी तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या इलेक्ट्रिक वाहनांच्या शोरूमला भेट देऊन अशा वाहनांची चौकशी करावी आणि या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी लातूर जिल्ह्यातील स्थानिक रहिवासी असलेल्या व किमान १८ वर्षे वय पूर्ण केलेल्या स्वयंरोजगार करू इच्छिणाऱ्या उमेदवारांना पात्र मानले जाईल; ज्यामध्ये सेवा उद्योगासाठी ५ लाख रुपयांवरील प्रकल्पासाठी आणि उत्पादन उद्योगासाठी १० लाख रुपयांवरील प्रकल्पासाठी उमेदवाराची किमान शैक्षणिक पात्रता आठवी पास असणे आवश्यक आहे.

तसेच अर्जदाराने यापूर्वी कोणत्याही शासकीय अनुदान योजनेचा लाभ घेतलेला नसावा आणि या योजनेंतर्गत प्रक्रिया व निर्मिती प्रकल्पासाठी १ कोटी रुपये (जास्तीत जास्त ५० लाख रुपयांच्या अनुदान मर्यादेत) तर सेवा उद्योग प्रकल्पासाठी ५० लाख रुपये (जास्तीत जास्त २० लाख रुपयांच्या अनुदान मर्यादेत) अशी मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र अर्जदारांनी जन्म दाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, वयाचा पुरावा, शैक्षणिक पात्रतेशी संबंधित कागदपत्रे किंवा प्रमाणपत्रे, पॅनकार्ड, जातीचे प्रमाणपत्र, फूड ऑन व्हील वाहतुकीसाठी आवश्यक परवानगी व वाहन चालविण्याचा परवाना, ग्रामीण भागासाठी ग्रामपंचायतीचे लोकसंख्या प्रमाणपत्र, सविस्तर प्रकल्प अहवाल आणि फोटो या सर्व आवश्यक कागदपत्रांसह https://maha-cmegp.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करावेत, असे आवाहन लातूर येथील जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक निखिल पाटील यांनी जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवक व युवतींना केले आहे.






# लातूर लॉयन्स, चाकूर चार्जर्स, उदगीर अनटाईड, जळकोट टायटन्सची विजयी घोडदौड

## लोकनेते विलासराव देशमुख ग्रामीण टी–१० क्रिकेट स्पर्धा

**लातूर/प्रतिनिधी :** लोकनेते विलासराव देशमुख ग्रामीण टी–१० क्रिकेट स्पर्धा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडत आहे. शुक्रवारी या स्पर्धेत लातूर लॉयन्स, चाकूर चार्जर्स, उदगीर अनटाईड, जळकोट टायटन्स या संघांनी विजय मिळवत आपले स्थान अधिक बळकट केले आहे.

शुक्रवारी रेणापूर रॉयल संघाने प्रथम फलंदाजी करताना १० षटकात चार गडी गमावून ११० धावा केल्या. यात रोहन रेड्डीने सर्वाधिक ३८ चेंडूत ८५ धावा केल्या. तर तसेच ११० धावांचा पाठलग करताना लातूर लॉयन्सच्या एमडी मोहम्मदने सर्वाधिक ४४ धावा केल्या. लातूर लॉयन्सच्या रोहण रेड्डी व बालाजी मुंडे यांनी प्रत्येकी दोन फलंदाजांना तंबूत धाडले. लातूर लॉयन्सने ७.४ षटकात ५ गडी गमान १११ धावा करत विजय मिळवला.

तसेच चाकुर चार्जर्सने देवणी डेअरडेव्हील संघास ११५ धावांचे उद्दिष्ट दिले होते. मात्र देवणी डेअरडेव्हील संघाने १० षटकात प्रयत्न करूनही १० गडी गमावून ९४ धावापर्यंतच मजल मारता आली. यात चाकुर चार्जरसचा २१ धावांनी विजय झाला. तसेच शिरुर अनंतपाळ स्ट्रायकरने उदगीर युनायटेड संघास १० षटकात ८० धावा काढण्याचे उद्दिष्ट दिले होते. उदगीर युनायटेड संघाने सदर उद्दिष्ट ९.५ षटकात ७ गडी गमावून ८२ धावा करत रोमाहर्षक विजय मिळवला. तर जळकोट टायटन्सच्या विरोधात ग्रामीण इंडियन्स संघाने १० षटकात ९ गडी गमावून ९४ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात जळकोट टायटन्सने ६ गडी गमावत ८.२ षटकात ९८ धावा करत उद्दिष्ट पूर्ण करत दमदार विजय मिळवला.

लोकनेते विलासराव देशमुख ग्रामीण टी–१० क्रिकेट स्पर्धेची संकल्पना माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांची आहे. ग्रामीण भागातील क्रिकेट खेळाडूंचे क्रीडा कौशल्य पाहूण क्रीडा प्रेमी भारावून जात आहेत.

# प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालयांचे अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर करण्यात येणार: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील येरवडा, ठाणे, रत्नागिरी आणि नागपूर येथील प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालयांचे अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर करणे हा केवळ आरोग्य व्यवस्थेचा विस्तार नसून, गुणवत्तापूर्ण उपचार, संशोधन आणि प्रशिक्षित मनुष्यबळ निर्मितीच्या दिशेने टाकलेला दूरदर्शी आणि मानवकेंद्री पाऊल आहे. यामुळे समाजातील वंचित घटकांपर्यंत अधिक सक्षम, सुलभ आणि आधुनिक मानसिक आरोग्य सेवा पोहोचविण्याचा आमचा संकल्प अधिक बळकट होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र राज्यातील येरवडा (पुणे), ठाणे, रत्नागिरी आणि नागपूर येथील चार प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालये समाजातील विशेषतः वंचित घटकांना मोठ्या प्रमाणावर आरोग्य सेवा पुरवत आहेत. बाह्यरुग्ण व आंतररुग्ण सेवांद्वारे ही रुग्णालये हजारो रुग्णांना उपचार देत असून, सुमारे ५७०० खाटांची सुविधा उपलब्ध असल्यामुळे त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा व मनुष्यबळ आहे. या पार्श्वभूमीवर, राज्य शासनाने या रुग्णालयांचे अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर करण्याचा महत्त्वपूर्ण प्रस्ताव पुढे आणला आहे. या उपक्रमामुळे मानसिक आरोग्य क्षेत्रात दर्जेदार उपचार सेवांसोबतच शिक्षण आणि संशोधनालाही चालना मिळणार आहे.

**केंद्र शासनाच्या योजनेशी सुसंगत उपक्रम**

केंद्र शासनाच्या मॅनपॉवर डेव्हलपमेंट स्कीम अंतर्गत, स्ट्रेंथनिंग पीजी डिपार्टमेंट इन मेंटल हेल्थ स्पेशालिटिज (स्कीम बी) या योजनेनुसार मानसिक आरोग्य क्षेत्रात प्रशिक्षित मनुष्यबळाची कमतरता दूर करण्यासाठी उपाययोजना करण्यात येत आहेत. राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत (एनएमएचपी) १२व्या पंचवार्षिक योजनेपासून या दिशेने विशेष भर देण्यात आला आहे. ज्या ठिकाणी आधीपासून पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत, अशा प्रादेशिक रुग्णालयांमध्ये मानसिक आरोग्याशी संबंधित पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यास प्राधान्य देण्यात येत आहे.

**शासन निर्णय आणि अभ्यासक्रमांची सुरुवात**

राज्य शासनाने १६ सप्टेंबर २०१९ रोजी शासन निर्णय निर्गमित करून खालील अभ्यासक्रमांना मान्यता दिली आहे:



एम.डी. सायकिअॅट्री
एम.फिल क्लिनिकल सायकॉलॉजी
एम.फिल सायकियाट्रिक सोशल वर्क
डिप्लोमा इन सायकियाट्रिक नर्सिंग.

हे अभ्यासक्रम प्रादेशिक मनोरुग्णालय ठाणे, पुणे (येरवडा) आणि नागपूर येथे सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**नागपूर येथे एम.डी. सायकिअॅट्रीला सुरुवात**

प्रादेशिक मनोरुग्णालय नागपूर येथे वैद्यकीय शिक्षण विभाग व सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या संयुक्त प्रयत्नांतून एम.डी. सायकिअॅट्री अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे.
इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथील अध्यापकांच्या सहकार्याने हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२२–२३ पासून सुरू झाला असून, दरवर्षी ४ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जात आहे. आजपर्यंत १२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून, त्यापैकी २ विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रम पूर्ण केला आहे.

**नर्सिंग क्षेत्रातही प्रगती**

प्रादेशिक मनोरुग्णालय ठाणे व पुणे येथे डिप्लोमा इन सायकियाट्रिक नर्सिंग अभ्यासक्रम २०२२–२३ पासून सुरू करण्यात आला आहे.प्रत्येक ठिकाणी दरवर्षी २० विद्यार्थी प्रवेश घेत आहेत. आतापर्यंत ठाणे येथून ५९ आणि पुणे येथून ६० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या उपक्रमामुळे मानसिक आरोग्य क्षेत्रात प्रशिक्षित नर्सिंग कर्मचाऱ्यांची उपलब्धता वाढण्यास मदत होत आहे. या चारही प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालयांचे पूर्णतः अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर केल्यामुळे पुढील फायदे अपेक्षित आहेत. रुग्णांना अधिक दर्जेदार आणि विशेषज्ञ उपचार सेवा. मानसिक आरोग्य क्षेत्रात प्रशिक्षित डॉक्टर, मानसशास्त्रज्ञ व सामाजिक कार्यकर्त्यांची संख्या वाढ. संशोधन आणि नवोपक्रमाला चालना. ग्रामीण व वंचित भागांपर्यंत गुणवत्तापूर्ण मानसिक आरोग्य सेवा विस्तार होणार.

महाराष्ट्रातील प्रादेशिक मानसिक आरोग्य रुग्णालयांचे अध्यापन संस्थांमध्ये रूपांतर हा केवळ आरोग्य क्षेत्रातील नव्हे तर शिक्षण आणि सामाजिक विकासाच्या दृष्टीनेही एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. केंद्र व राज्य शासनाच्या समन्वयातून राबविण्यात येणारा हा उपक्रम राज्यातील मानसिक आरोग्य सेवांना नवे बळ देणारा ठरेल.

# विनायकराव कदम हे भगवद् गीतेचे भाष्यकार होते: डॉ. विवेक सौताडेकर

## विनायकराव कदम 'प्रथम स्मृती समारंभ' निमित्त व्याख्यान



**लातूर/प्रतिनिधी :** ज्येष्ठ साहित्यिक तथा संगीतरत्न स्मृतीशेष विनायकराव कदम पाटील हे एक आदर्श शिक्षक,व्यासंगी संस्कृत अभ्यासक व संगीत विशारद होते. महानुभाव पंथाचे ते अनुयायी असून त्यांच्यावर आर्य समाजाचाही प्रभाव होता. संस्कृत भाषेवर त्यांची पकड असून भगवद्गीता हा त्यांच्या अभ्यासाचा विषय होता. तेराव्या शतकात संत ज्ञानेश्वरांनी गीतेचा मराठीत अनुवाद करून 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ सर्वसामान्यांना अर्पण केला. त्यानंतर मराठी भाषेत गीतेवर अनेकांनी टिका केली. त्याचप्रमाणे तब्बल पाच दशकं गीतेचा अभ्यास करून श्रीमद् भगवद्गीता– समश्लोकी मराठी अनुवाद हा ग्रंथ प्रकाशित करुन गीतेचे सार तत्व मराठी भाषेत उतरविणारे विनायकराव कदम पाटील हे वर्तमानातील भगवद् गीतेच्या समश्लोकी मराठी अनुवादाचे भाष्यकार होते असे प्रतिपादन साहित्यिक तथा इतिहास संशोधक डॉ.विवेक सौताडेकर यांनी केले.

लातूर येथील दिवंगत ज्येष्ठ साहित्यिक तथा संगीतकार स्मृतीशेष विनायकराव पंडितराव कदम पाटील यांच्या प्रथम स्मृती दिनानिमित्तानेपारंपारिक 'वर्षश्राद्ध' या संकल्पनेला फाटा देऊन त्यांच्या विचारांचा वारसा पुढे चालवण्याचे हेतूने कदम पाटील परिवाराच्या वतीने 'पितृ देवो भव:' या विषयावर व्याख्यान व 'स्वरांजली' कार्यक्रमाचे आयोजन हॉटेल वाडा येथील बॅंक्वेट हॉलमध्ये करण्यात आले होते.

याप्रसंगी बोलताना डॉ.सौताडेकर पुढे म्हणाले की, वडील हे आपल्या कुटुंब व्यवस्थेचा कणा असून आईप्रमाणे वडिलांनाही महत्त्वाचे स्थान आहे. इतिहास काळातील शहाजीराजे भोसले, सुभेदार रामजी सपकाळ, प्रबोधनकार ठाकरे, नरेंद्र जाधव यांची वडील दामू जाधव, विश्वास नांगरे पाटील यांचे वडील नारायणराव ते स्मृतिशेष विनायकराव कदम पाटील अशा श्रेष्ठ बाबांची महती व प्रेरणादायी पुढच्या पिढीने समजून घेणे गरजेचे आहे.

व्याख्यानानंतर मुंबई येथील विख्यात संगीतकार पंडित रमाकांत गायकवाड यांचा 'स्वरसंगीत' बहारदार कार्यक्रम संपन्न झाला. दोन्हीही कार्यक्रमाला रसिक श्रोत्यांनी उत्स्फूर्तपणे दाद दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षक नेते तथा साहित्यिक ब्रिजलाल विनायकराव कदम पाटील यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा. शंतनु कदम यांनी मानले तर सूत्रसंचालन कु. चारुशीला रवींद्र काळम यांनी केले. कार्यक्रमास तालमणी डॉ.राम बोरगावकर, सोनू डगवाले, प्राचार्य डॉ.अशोक काळम,अॅड. सोनवणे, माजी चेअरमन यशवंतराव पाटील,जिल्हा परिषद माजी सदस्य राजकुमार पाटील, प्राध्यापक ,शिक्षकवृंद, समाजातील प्रतिष्ठित नागरिक आदींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीच्या १२ विद्यार्थ्यांची मेडप्लस कॅम्पस मुलाखतीत निवड



खरोसे मोहिनी | चाटे ऋतुजा | कांबळे बबिता | घोबळे अंकिता | नंदगावे आशा | शंभू सूर्यवंशी
दराडे निखिल | लाव्हारे विनायक | सोनकांबळे दीपक | कुलकर्णी कृष्णा | जाधव सुमित | गोरे प्रदीप

**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी, लातूर येथे विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या मेडप्लस कंपनीच्या कॅम्पस ड्राइव्हमध्ये दयानंद इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीच्या डी. फार्मसी अंतिम वर्षातील १२ विद्यार्थ्यांची यशस्वी निवड झाली आहे. ही मुलाखत प्रक्रिया दि. १८ मे २०२६ रोजी पार पडली.

कॅम्पस ड्राइव्हमध्ये लेखी परीक्षा, तांत्रिक मुलाखत तसेच एचआर मुलाखत अशा विविध टप्प्यांद्वारे विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये मुलींमधून खरोसे मोहिनी, चाटे ऋतुजा, कांबळे बबिता, नंदगावे आशा व घोबळे अंकिता यांचा समावेश आहे. तर मुलांमधून कुलकर्णी कृष्णा, जाधव सुमित, दराडे निखिल, गोरे प्रदीप, शंभू सूर्यवंशी, लाव्हारे विनायक आणि सोनकांबळे दीपक यांनी उत्कृष्ट कामगिरी करत आपली गुणवत्ता सिद्ध केली.

या उल्लेखनीय यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. लक्ष्मीरमणजी लाहोटी, उपाध्यक्ष ललितभाई शहा व रमेशजी राठी, सचिव मा. रमेशजी बियाणी, संयुक्त सचिव मा. विशालजी लाहोटी, सहाय्यक सचिव मा. श्रीकांतजी उटगे व मा. अजिंक्यजी सोनावणे, कोषाध्यक्ष मा. संजयजी बोरा तसेच संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाजिद चाऊस, प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे–भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

## यांत्रिकीकरणामुळे बैलजोडी मागे; ट्रॅक्टरचा वापर वाढला

गणेगाव(प्रतिनिधी)-सध्याचे युग हे संगणकीय युग आहे. प्रत्येक क्षेत्रात माणसाच्या कष्टाला आधुनिकतेची जोड देण्याचा प्रयत्न होत आहे. शैक्षणिक, औद्योगिक क्षेत्रासह कृषी क्षेत्रातही आधुनिकतेला प्राधान्य देत शेतीकामात यांत्रिकीकरणावर भर दिला जात असून ट्रॅक्टरचा वापर वाढल्याचे चित्र दिसून येत आहे.

अलीकडे शेतीतील बैल बारदाना वाढत्या मजूर टंचाईमुळे मोडीत निघत असून दावणीची जनावरेही कमी होत चालल्याचे चित्र आहे. अनेक जनावरांना चारा, पाणी व मजूर टंचाईमुळे बाजाराचा रस्ता दाखवला जात आहे. अनेक जण शेती वाट्याने देत असून बैल औताला पर्याय म्हणून ट्रॅक्टरचा वापर वाढला आहे. शेती क्षेत्रात ट्रॅक्टरला जोडलेली विविध यंत्रे विकसित झाल्याने या यंत्राला शेतकऱ्यांकडून मोठी मागणी आहे. त्यामुळे बैलजोडीच्या सहाय्याने होणारी विविध शेतीची कामे कालबाह्य होण्याच्या मार्गावर आहेत. मात्र, आधुनिक यंत्रामुळे शेती मशागतीच्या कामांना वेग येत आहे.

यांत्रिकीकरणाच्या युगामध्ये दिवसेंदिवस आमूलाग्र बदल होत आहेत. त्यामुळे ट्रॅक्टरच्या सहाय्याने शेतातील नागरणी, मोगडा, पाळी, रोटर आदी कामे बहुतांश शेतकरी करत आहेत. यास शेतकऱ्यांचाही चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्याचबरोबर ट्रॅक्टरच्या सहाय्याने सर्व कामे कमी वेळात व जलदगतीने केली जात असल्याचे अंतरगाव येथील शेतकरी अनंता खैरे यांनी सांगितले. पूर्वी ग्रामीण भागात घरोघरी असणारी जनावरे आता कमी होत असल्याने जनावरांची लक्षणीय घट झाली आहे.

## राज्यात मतदार याद्यांची मोठी शुद्धीकरण मोहीम; २००२ च्या यादीनुसार होणार विशेष मॅपिंग!

### दुबार नावे हटणार, लाखो मतदारांची माहिती डिजिटल पद्धतीने अपडेट होणार

धाराशिव (शेख अंजुम)- राज्यातील मतदार याद्या अधिक अचूक, पारदर्शक आणि त्रुटीमुक्त करण्यासाठी निवडणूक आयोगाने मोठे पाऊल उचलले आहे. २००२ च्या मतदार यादीनुसार राज्यभर विशेष मॅपिंग मोहीम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून, यामुळे लाखो मतदारांच्या नोंदींची फेरतपासणी केली जाणार आहे.

मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील अनेक मतदारांच्या नावांमध्ये त्रुटी, दुबार नोंदी, मृत व्यक्तींची नावे तसेच स्थलांतरित नागरिकांची माहिती अद्याप कायम असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे आगामी निवडणुकांपूर्वी मतदार यादी अधिक शुद्ध आणि अचूक करण्यासाठी ही विशेष मोहीम सुरू करण्यात येत आहे.

यामध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून मतदारांची माहिती अपडेट केली जाणार आहे. प्रत्येक जिल्ह्यातील प्रशासन, तहसील कार्यालय, ग्रामपंचायत आणि महानगरपालिका स्तरावर विशेष पथके तयार करण्यात आली असून, घराघरात जाऊन माहिती तपासली जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे.

निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे की, कोणत्याही पात्र मतदाराचे नाव विनाकारण कमी केले जाणार नाही. मात्र, दुबार नावे आणि बनावट नोंदी हटविण्यावर भर दिला जाणार आहे. त्यामुळे नागरिकांनी स्वतःची नावे, पत्ता, जन्मतारीख आणि इतर माहिती वेळेत तपासून घ्यावी असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

दरम्यान, या प्रक्रियेमुळे काही ठिकाणी राजकीय वातावरण तापण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विरोधी पक्षांकडून मतदारांची नावे कमी होणार नाहीत ना? असा सवाल उपस्थित करण्यात येत असताना निवडणूक आयोगाने सर्व प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने होणार असल्याचा दावा केला आहे.

ग्रामीण भागात अनेक नागरिकांना ऑनलाइन प्रक्रियेची माहिती नसल्याने प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहणार आहे. त्यामुळे ग्रामसेवक, बूथ लेव्हल अधिकारी (BLO) आणि स्थानिक प्रशासन यांच्यावर मोठी जबाबदारी येणार आहे.

राज्यातील आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही मोहीम अत्यंत महत्त्वाची मानली जात असून, यामुळे मतदार यादीतील गोंधळ कमी होऊन मतदान प्रक्रिया अधिक विश्वासार्ह होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## आजच्या स्वार्थी जगात माणूस आयुष्यभर कमावतो, घरासाठी, कुटुंबासाठी, भविष्यासाठी...

धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- ६५ वर्षांचा झाल्यावर लोक त्याला सांगतात - आता आराम करा विश्रांती घ्या!

पण काही व्यक्तिमत्त्वं अशी असतात, ज्यांच्या रक्तातच 'समाजासाठी देणं' लिहिलेलं असतं.

अशा व्यक्ती स्वतःसाठी जगत नाहीत त्या इतिहास घडवतात!

अकोल्याच्या मातीत जन्मलेले प्रा. मुकुंद पाध्ये हे असंच एक प्रेरणादायी नाव!

आयुष्यभर विद्यार्थ्यांच्या हातात फक्त गणिताची पुस्तकं दिली नाहीत, तर जीवनाचं खरं गणित शिकवलं. हजारो विद्यार्थ्यांच्या भविष्याला दिशा देणाऱ्या या शिक्षकाने आपल्या ६५ व्या वाढदिवशी असा निर्णय घेतला, की संपूर्ण महाराष्ट्र अभिमानाने भारावून गेला.

स्वतःच्या वाढदिवसाचा कोणताही गाजावाजा नाही.

ना मोठा कार्यक्रम, ना सत्कार, ना प्रसिद्धीची हाव!

उलट, आपल्या आयुष्यभराच्या कमाईतून तब्बल १ कोटी रुपयांचा धनादेश भारतीय सैन्याच्या पुणे येथील कार्यालयाकडे सुपूर्द करून, त्यांनी देशसेवेचा सर्वोच्च आदर्श समाजासमोर ठेवला.

**हे केवळ दान नाही**

हा एका शिक्षकाने देशाच्या सैनिकांप्रती व्यक्त केलेला कृतज्ञतेचा महासागर आहे!

आपण सुरक्षित घरात बसून आयुष्याचे हिशोब मांडत असतो

पण सीमेवर उणे तापमानात उभा असलेला सैनिक आपल्या रक्ताने देशरक्षणाची नवी परिभाषा लिहित असतो.

आपण निर्धास्त झोपावं म्हणून कोणीतरी आपली तरुण स्वप्नं देशासाठी अर्पण करत असतो.

त्या सैनिकांच्या त्यागाची जाणीव ज्याला होते, तोच खऱ्या अर्थाने भारतीय असतो आणि प्रा. मुकुंद पाध्ये हे त्याच विचारांचे तेजस्वी उदाहरण ठरले आहेत.

आयुष्यभर विद्यार्थ्यांना १०० पैकी १०० गुण मिळवून देणाऱ्या या शिक्षकाने, काल देशभक्तीच्या परीक्षेत स्वतःच हंड्रेड आऊट ऑफ हंड्रेड मिळवले! आज पैसा कमावणारे अनेक दिसतात. पण पैसा समाजासाठी खर्च करणारे हात फार थोडे असतात.

**पाध्ये सरांनी सिद्ध करून दाखवलं की, खरी श्रीमंती बँक खात्यात नसते ती मनात असते!**

विशेष म्हणजे, एवढं मोठं दातृत्व करूनही त्यांनी कोणतीही प्रसिद्धी केली नाही.

ही माहिती समोर आल्यानंतर समाजमनातून त्यांच्या विषयीचा आदर आणखी वाढला आहे. अशा शिक्षकांमुळेच समाज जिवंत आहे. अशा व्यक्तींमुळेच देशभक्ती अजूनही जिवंत आहे. आणि अशा दानशूर हातांमुळेच सैनिकांच्या मनात देशासाठी लढण्याची ऊर्जा अधिक मजबूत होत असते. प्रा. मुकुंद पाध्ये सरांना ६५ व्या वाढदिवसानिमित्त साष्टांग दंडवत! आपल्या या अथांग दातृत्वाला आणि राष्ट्रप्रेमाला मनःपूर्वक सलाम!

## १,७७,००० 'तडजोड शुल्क' केली वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.२२ में एप्रिल रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण २१३ कारवाया करुन १,७७,००० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

## लोणच्यासाठी गृहिणींची लगबग



तामलवाडी(प्रतिनिधी)-तामलवाडी ग्रामीण भागातील जेवणाचा स्वाद वाढवणाऱ्या आंब्याच्या लोणच्याची तयारी सध्या वेगात सुरू झाली आहे. गृहिणींची लगबग पाहायला मिळत आहे. उन्हाळा सुरू होताच घराघरांत लोणचे बनवण्याची परंपरा जपली जात असली तरी यंदा वाढलेल्या महागाईमुळे लोणचे तयार करणे गृहिणींसाठी खर्चिक ठरत आहे. ग्रामीण भागात पूर्वी सहज उपलब्ध होणारा पारंपरिक गावरान आंबा आता नामशेष होण्याच्या मार्गावर असल्याचे चित्र आहे. कमी कालावधीत फळ देणाऱ्या कलमी आंब्यांची लागवड वाढल्याने लोणच्यासाठी योग्य मानल्या जाणाऱ्या गावरान कैऱ्यांची उपलब्धता घटली आहे. लोणच्याला खास चव, टिकाऊपणा आणि नैसर्गिक आंबटपणा देण्यासाठी गावरान आंब्यालाच विशेष पसंती दिली जाते. त्यामुळे बाजारात त्याची मागणी वाढली असून, आवक मात्र मर्यादित असल्याने दरांनी मोठी उसळी घेतली आहे. धाराशिव जिल्ह्यात मागील पंधरा ते वीस दिवसांपासून अधूनमधून वादळी वाऱ्यांचा प्रभाव असल्याने अनेक ठिकाणी आंबा उत्पादकांना फटका बसला आहे. तरीही गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा आंबा उत्पादन समाधानकारक असल्याचे शेतकरी सांगत आहेत. ग्राहकांची वाढती मागणी लक्षात घेऊन उत्पादकांकडून आठवडी बाजारात गावरान कैऱ्यांची विक्री केली जात आहे. कामगार बंधू ५० पैशाला एक आंबा फोडून देतोय लोणचे टाकण्यापूर्वी आंब्याच्या फोडी करणे अनिवार्य असल्याने शेकडा पन्नास रुपये दराने आंबा फोडून घ्यावा लागत आहे. त्यामुळे आंबा फोडणी करणाऱ्यांना सध्या सुगीचे दिवस आले आहेत. पारंपरिक चव आणि घरगुती खाद्यसंस्कृती जपण्यासाठी गृहिणी वाढत्या खर्चालाही न जुमानता गावरान आंब्याचे लोणचे तयार करत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. कैरीचे दर यंदा दुपटीने वाढले, त्यामुळे लोणचे महागले गेल्या वर्षी शेकडा ३०० रुपयांपर्यंत मिळणाऱ्या लोणच्याच्या कैऱ्यांचे दर यंदा तब्बल ७५० ते ८०० रुपये शेकड्यापर्यंत पोहोचले आहेत. तसेच बाजारात कैऱ्या प्रति किलो सुमारे ५० रुपयांप्रमाणे विक्रीस उपलब्ध आहेत.

परिणामी गृहिणींच्या घरगुती बजेटवर अतिरिक्त ताण पडत आहे. लोणचे तयार करण्यासाठी केवळ कैऱ्याच नव्हे, तर मीठ, मोहरी, हळद, तेल, लसूण, मिरे, लवंग, मेथी, तीळ, हिंग आदी मसाल्यांची आवश्यकता असते. या सर्व वस्तूंच्या वाढलेल्या दरांमुळे लोणचे बनविण्याचा खर्च अधिकच वाढला आहे. याशिवाय लोणचे टिकवून ठेवण्यासाठी चिनीमातीच्या व काचेच्या बरण्यांची खरेदीही केली जात आहे.

## रामकृष्ण परमहंस महाविद्यालय रोजगार मेळाव्यात ३३७ उमेदवार मुलाखतीसाठी उपस्थित तर १३८ उमेदवारांची प्राथमिक निवड



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- येथील रामकृष्ण परमहंस महाविद्यालय आणि जिल्हा कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता मार्गदर्शक केंद्र धाराशिव यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा पार पडला. यावेळी ३३७ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्षात येऊन नोंदणी केली व मुलाखती दिल्या. त्यापैकी १३८ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली आहे.

सदर मुलाखतीसाठी १४ आस्थापना मुलाखतीसाठी आलेल्या होत्या.

सदर मुलाखतीचे आयोजन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉक्टर संदीप देशमुख आणि कौशल्य विकास केंद्राचे सहाय्यक आयुक्त संजय गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.

यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. सुयोग अमृतराव ,श्री विक्रम सिंह घोलकर,श्री अमोल बळे हे लाभले होते. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालय विकास समितीचे सदस्य श्री नानासाहेब पाटील हे होते. सदर कार्यक्रमाचे प्रस्ताविक सहाय्यक आयुक्त श्री संजय गुरव यांनी केली,सूत्रसंचालन प्रा.डॉ. अरविंद हंगरगेकर यांनी केले तर आभार प्रा.डॉ . दत्तात्रय साखरे यांनी मानले. यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य ग्रंथपाल डॉ.मदनसिंग गोलवाल उपस्थित होते

सदर कार्यक्रमासाठी शिक्षण महर्षी डॉ बापूजी साळुंखे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, प्लेसमेंट आणि प्रशिक्षण केंद्राचे समन्वयक प्रा.डॉ. मारुती अभिमान लोंढे, जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शक केंद्रातील परिविक्षाधीन प्रशिक्षणार्थी सहा. आयुक्त श्री दत्ता चव्हाण सर्व प्रशासकीय अधिकारी , कर्मचारी आणि महाविद्यालयातील गुरुदेव कार्यकर्ते उपस्थित होते. उपस्थित होते. सदर कार्यक्रम महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संदीप देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला .

## धाराशिव जिल्ह्यात अवैध मद्याविरोधात पोलिसांचा मोठा धडक अभियान; २६ कारवाया, लाखोंचा मुद्देमाल जप्त

धाराशिव (शेख अंजुम)- पोलिस अधीक्षक रितू खोखर यांच्या मार्गदर्शनाखाली धाराशिव जिल्ह्यात अवैध मद्य व्यवसायाविरोधात मोठी कारवाई करण्यात आली. गुरुवार दि.२२ मे २०२६ रोजी जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्यांच्या हद्दीत एकाच दिवशी तब्बल २६ कारवाया करण्यात आल्या. या कारवायांमध्ये घटनास्थळावरून सुमारे १७०० लिटर गावठी दारू निर्मितीसाठी वापरला जाणारा गुळमिश्रित रासायनिक द्रव, १४३ लिटर गावठी दारू, १८० लिटर सिंधी ताडी अमली द्रव तसेच देशी-विदेशी दारूच्या ११० सिलबंद बाटल्या जप्त करण्यात आल्या. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत अंदाजे १ लाख ६९ हजार १६० रुपये असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली. अवैध मद्यविक्री व निर्मिती रोखण्यासाठी धाराशिव पोलिसांनी कठोर भूमिका घेतली असून, महाराष्ट्र मद्य मनाई कायद्यांतर्गत संबंधित पोलिस ठाण्यांमध्ये २६ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. जिल्ह्यात सुरू असलेल्या या धडक मोहिमेमुळे अवैध धंदे करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून, कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिस प्रशासन अधिक सतर्क झाल्याचे दिसून येत आहे.

मध्य रेल्वे
सोलापूर विभाग
सायबर सुरक्षा विषयक कामे
वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD), मध्य रेल्वे, सोलापूर, आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांकरिता प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-खरेदी संकेतस्थळावर www.ireps.gov.in ऑनलाईन ई-निविदा आमंत्रित करत आहेत. **निविदा क्रमांक:** SUR/TD/T/2026/05. **कामाचे नाव:** मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागामध्ये सायबर सुरक्षा अंमलबजावणी आणि SCADA प्रणालीचे अद्यतनीकरण. **अंदाजित खर्च:** रु. १४,८५,०५,९६७.५५. **निविदा सुरक्षा:** रु. २९,७०,१००/-.**कामाचा कालावधी:** २४ महिने. **प्रस्तावाची वैधता:** ९० दिवस. **संकेतस्थळावर निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** १७.०६.२०२६ रोजी १५:०० वाजता.
वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD), मध्य रेल्वे, सोलापूर
AK/Sur-34
सुरक्षित प्रवास करा; फूटबोर्डवर प्रवास करणे टाळा.

केंद्रीय पेट्रोरसायन अभियांत्रिकी एवं प्रौद्योगिकी संस्थान (सिपेट)
सिपेट CIPET
(रसायन व पेट्रोरसायन विभाग, रसायन व उर्वरक मंत्रालय, भारत सरकार)
सत्यमेव जयते
प्लॉट क्रमांक जे -3/2, चिकलठाणा औद्योगिक क्षेत्र, छत्रपती संभाजीनगर - 431006
प्रवेश सूचना : शैक्षणिक वर्ष 2026-27 साठी प्रवेश देणे सुरू
डिप्लोमा, पोस्ट डिप्लोमा आणि पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा अभ्यासक्रम
- डिप्लोमा इन प्लास्टिक्स् टेक्नोलॉजी (डी.पी.टी) कालावधी : ३ वर्षे, प्रवेश अर्हता : १० वी (पास)
- डिप्लोमा इन प्लास्टिक्स् मोल्ड टेक्नोलॉजी (डी.पी.एम.टी.) कालावधी : ३ वर्षे, प्रवेश अर्हता : १० वी (पास)
- पोस्ट ग्रॅज्यूएट डिप्लोमा इन प्लास्टिक्स् प्रोसेसिंग अ‍ॅण्ड टेस्टिंग (पी.जी.डी.-पी.पी.टी) कालावधी : २ वर्षे, प्रवेश अर्हता : विज्ञान शाखेतील ३ वर्षाची पदवी (पूर्ण वेळ) वयोमर्यादा नाही
- पोस्ट डिप्लोमा इन प्लास्टिक्स् मोल्ड डिझाईन विथ कॅड / कॅम (पी.डी. -पी.एम.डी. विथ कॅड / कॅम) कालावधी : 1½ वर्षे, प्रवेश अर्हता : ३ वर्षांचा अभियांत्रिकी डिप्लोमा.
उत्कृष्ट प्लेसमेंट ट्रॅक रेकार्ड
AICTE मान्यताप्राप्त कोर्सेस
महत्वाची तारीख
अर्ज भरण्याची शेवटची तारीख : 31 मे 2026
सिपेट प्रवेश परिक्षेची (CAT) तारीख : 7 जुन 2026
ऑनलाईन प्रवेश अर्ज : https://cipet26.onlineregistrationform.org/CIPET/
Scholarship facility for eligible SC/ST & OBC Students
अर्ज करण्यासाठी स्कॅन करा
डिप्लोमा - थेट द्वितीय वर्ष प्रवेश - 2026 (LATERAL ENTRY ADMISSION 2026)
AICTE मान्यताप्राप्त ३ वर्षांच्या प्लास्टिक्स अभियांत्रिकी व तंत्रज्ञान डिप्लोमा अभ्यासक्रमांच्याथेट द्वितीय वर्ष प्रवेशासाठी अर्ज आमंत्रित करण्यात येत आहेत.
- डिप्लोमा इन प्लास्टिक्स मोल्ड टेक्नॉलॉजी (DPMT) — २ वर्षे
- डिप्लोमा इन प्लास्टिक्स टेक्नॉलॉजी (DPT) — २ वर्षे
त्वरा करा! मर्यादित जागा उपलब्ध
पात्रता : 10+2 (HSC) उत्तीर्ण / १०वी + २ वर्षे ITI उत्तीर्ण
अर्ज करण्याची अंतिम तारीख : ३०/०५/२०२६ | लेखी परीक्षा / मुलाखत तारीख : ०५/०६/२०२६
ऑनलाइन अर्ज करा : - https://tinyurl.com/CIPETCSTS
प्रवेश पात्रता परीक्षेला बसलेले उमेदवार देखील वरील सर्व अभ्यासक्रमांसाठी अर्ज करण्यास पात्र आहेत.
प्रवेशासाठी संपर्क - 72 62 002 001 / 72 62 003 001 / 93 73 687 915
Tel: (0240) 2478322, 2478302 ✉ ltc-aurangabad@cipet.gov.in / aurangabad@cipet.gov.in www.cipet.gov.in

लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708
9284321472

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649